

२०११-१२

# स्पंदन

श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर)

संचलित

## दूधसाखर महाविद्यालय, बिद्री

# श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री



'साहित्य निर्मिती प्रक्रिया' या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. आशा अपराद.



नकुशीं झाल्या शीतल, सई, वैष्णवी 'नामांतर सोहळा'.



'जरासे भान राहू द्या रे' या विषयावर बोलताना अॅड. अपर्णा रामतीर्थकर.



'व्यक्तिमत्त्व विकास व अभ्यास तंत्र' या कार्यशाळेचे उद्‌घाटन करताना मा. प्राचार्य डॉ. आर. एल. राजगोळकर.




लांजा येथे '१९८० नंतरचे मराठी साहित्य' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्रात निवंधवाचन करताना प्रा. डॉ. संजय पाटील.



राज्यशास्त्र विभागाच्या वतीने २६ नोव्हेंबर २०११ रोजी 'संविधान दिन' साजरा करण्यात आला.




बी. भाग ३ 'सदिच्छा समारंभ' मार्गदर्शन करताना प्रा. चिंतामणी जाधव.




बी.एस्सी. भाग ३ 'सदिच्छा समारंभ' मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. शशिकांत सावंत

स्पंदन

श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर)
संचलित

# दूधसाखर महाविद्यालय, बिद्री - (मौनीनगर)

ता. कागल, जि. कोल्हापूर

वार्षिक अंक एकोणिसावा

सन २०११-१२

## संपादक मंडळ

प्रमुख संपादक

**प्राचार्य डॉ. आर. एल. राजगोळकर**

कार्यकारी संपादक

**प्रा. डॉ. संजय पाटील**

विभागीय संपादक

**प्रा. डॉ. संजय पाटील** मराठी विभाग

**प्रा. डॉ. सादिक देसाई** हिंदी विभाग

**प्रा. चिंतामणी जाधव** इंग्रजी विभाग

**प्रा. डॉ. मानसिंग टाकळे** शास्त्र विभाग

# स्थानिक व्यवस्थापन समिती

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | मा. आमदार कृष्णराव परशराम पाटील |
| उपाध्यक्ष | : | मा. आनंदराव यशवंतराव पाटील |
| सदस्य | : | मा. विजयसिंह कृष्णाजी मोरे |
| सदस्य | : | मा. नामदेवराव शंकरराव भोईटे |
| सदस्य | : | मा. वसंतराव बापूसो (तु) पाटील |
| मुख्य सचिव | : | मा. एस. एस. चौगले |
| सचिव | : | प्राचार्य डॉ. आर. एल. राजगोळकर |
| शिक्षक प्रतिनिधी | : | प्रा. डॉ. संजय दशरथ पाटील |
| शिक्षक प्रतिनिधी | : | प्रा. दिनकर केरबा शिंदे |
| शिक्षक प्रतिनिधी | : | प्रा. दिगंबर दत्तोबो कोमेजवार |
| शिक्षकेतर प्रतिनिधी | : | श्री. प्रल्हाद विश्वास पाटील |


रजि. नं. : केपीआर/केजीएल/आरएसआर (सीआर) २२६६/९९
स्थापना : १५-१०-१९९९

**श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ सेवकांची सहकारी पतसंस्था**
**बिद्री (मौनीनगर), ता. कागल, जि. कोल्हापूर.**

आकर्षक व्याज दर (द. सा. द. शे.)

मुदतवंद ठेव :

| | |
|---|---|
| ४६ दिवस ते १२ महिने : | ९% |
| १३ महिने ते ३६ महिने : | ११% |
| ३७ महिने ते ६० महिने : | १२% |
| रिकरिंग ठेव : | ९% |

| | | |
|---|---|---|
| ठेव | : | १०९:४२ लाख |
| कर्जे | : | १४६:११ लाख |
| फंडस् | : | १४:८५ लाख |
| गुंतवणूक | : | १४:८४ लाख |
| खेळते भांडवल | : | १७८:४७ कोटी |

सभासद व बिगर सभासद यांचेकडून ठेवी स्विकारल्या जातील.

ऑडिट वर्ग : 'अ

सभासद हित, तत्पर सेवा

# श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री



**मा. आम. के. पी. पाटीलसो**
अध्यक्ष,
दूधगंगा वेदगंगा सह. साखर कारखाना लि., बिद्री
श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री

**मा. ए. वाय. पाटीलसो**
उपाध्यक्ष,
दूधगंगा वेदगंगा सह. साखर कारखाना लि., बिद्री
श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री





**मा. डॉ. आर. एल. राजगोळकर**
प्राचार्य,
दूधसाखर महाविद्यालय, बिद्री

# श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री

## संस्था पदाधिकारी



**मा. आर. डी. देसाई**

कार्यकारी संचालक बिद्री कारखाना व
मानद सचिव श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री



**मा. एस. एस. चौगले**

मुख्य सचिव, बिद्री कारखाना व
श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री



मा. विजयसिंह कृ. मोरे



मा. नामदेवराव शं. भोईटे



मा. दत्तात्रय श्री. पाटील



मा. गणपती गुं. फराकटे



मा. वसंतराव बा. (तु.) पाटील



मा. प्रविणसिंह वि. पाटील

# श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री



मा. दत्तात्रय तु. खराडे



मा. पंडितराव द. केणे



मा. केरबा गो. नांदेकर



मा.धनाजी रा. देसाई



मा. श्रीपती बा. पाटील



मा. जीवन पां. पाटील



मा. नेताजी कुं. पाटील



मा. सुनिल शि. कांबळे



मा. राजेखान का. जमादार



मा. विलास कों. झोरे



मा.सौ.सविता भि.एकल



मा.सौ.कमल धों.चौगले

राष्ट्रीय

तळाशी,



विशेष श्रमसंस्कार शिबीराचे उद्घाटन करताना शिवाजी विद्यापीठाचे एन. एस. एस. प्रमुख डॉ. डी. के. गायकवाड.



तळाशी येथे वृक्षारोपण करताना स्वयंसेवक सोबत प्रा. ए.डी. जानवे.



तळाशी येथे वृक्षारोपण करताना स्वयंसेवक.



तळाशी येथे गोचिड निर्मुलन लस फवारणी करताना स्वयंसेवक.



आदमापूर येथील बाळूमामा मंदीर स्वच्छता करताना स्वयंसेवक.



राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती समारंभात मार्गदर्शन करताना प्रा. एस.आर. पाटील.



बिद्री येथे ग्रामसफाई करताना स्वयंसेविका.



महात्मा गांधी जयंती कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्रा. पांडूरंग फराकटे.

# आमचे गुणवंत



सचिन मसु गौड
बी. ए. भाग १-प्रथम



कु. अरुणा नामदेव जितकर
बी. ए. भाग २-प्रथम
शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती



कु. अश्विनी कृष्णा फराकटे
बी. ए. भाग ३-प्रथम



किरण पांडुरंग बोडके
बी. एस्सी. भाग १-प्रथम



सुशिल राजेंद्र पाटील
बी. एस्सी. भाग २-प्रथम



कु. शितल आनंदा भोईटे
बी. एस्सी. भाग २-प्रथम



कु. सिमा पांडुरंग पाटील
बी. एस्सी. भाग ३-प्रथम



कु. तेजस्विनी नेताजी यादव
शिवाजी विद्यापीठ
गुणवत्ता शिष्यवृत्ती



कु. प्रगती विष्णू पाटील
शिवाजी विद्यापीठ
गुणवत्ता शिष्यवृत्ती



कु. स्नेहलता आनंदा पाटील
राज्यस्तरीय रसायन शास्त्र कार्यशाळेत
तोंडी परिक्षेत - द्वितीय क्रमांक

## हार्दिक अभिनंदन



प्रा. डॉ. शशिकांत सावंत
रसायनशास्त्र विषयात पीएच. डी.



प्रा. डॉ. सतिश गंगावणे
भौतिकशास्त्र विषयात पीएच. डी.

# श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री



वार्षिक गुणगौरव समारंभात मार्गदर्शन करताना प्राचार्य निरंजन खिचडी.



वार्षिक गुणगौरव समारंभात पारितोषिक वितरण करताना प्राचार्य निरंजन खिचडी.



वार्षिक गुणगौरव समारंभात स्वागतगीत सादर करताना महाविद्यालयाचे विद्यार्थी विद्यार्थिनी.



वार्षिक गुणगौरव समारंभात संगित शेला पागोटा सादर करताना प्रा. डॉ. संजय पाटील.



मकर संक्रांत दिनानिमित्त पारंपरिक वेशभूषा दिन.



संख्याशास्त्राच्या कार्यशाळेदिवशी लघुनाटीका सादर करताना महाविद्यालयाचे विद्यार्थी.





संख्याशास्त्राच्या कार्यशाळेदिवशी पथनाट्य सादर करताना महाविद्यालयाचे विद्यार्थी.

# संपादकीय ...

'स्पंदन'चा हा एकोणिसावा अंक आम्ही प्रसिद्ध करीत आहोत. २०११-२०१२ या शैक्षणिक वर्षात आमच्या महाविद्यालयात विविध उपक्रम पार पडले. यामध्ये वार्षिक अंकात लेखन करणाऱ्या नवोदितांना 'भोगले जे दु:ख त्याला' या आत्मचरित्राच्या लेखिका प्रा. आशा अपराध (कोल्हापूर) यांनी मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी कथा, कविता, कादंबरी, आत्मचरित्र, ललित साहित्य कसे लिहावे हे सांगितले. आपल्या जीवनानुभवाबरोबर स्वत:च्या साहित्यनिर्मितीची बीजे विद्यार्थ्यांसमोर उलगडून दाखविली. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांना हे मार्गदर्शन भावले ते ते मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

३ जानेवारी २०१२ रोजीच्या ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनाचे औचित्य साधून आम्ही महाविद्यालयातील 'नकुशी' नावाच्या ३ विद्यार्थिनींचा नामांतर सोहळा घेतला व त्यांचे शैक्षणिक पालकत्वही स्विकारले. हा आमच्या महाविद्यालयातील एक अनोखा आणि समाजाभिमुख कार्यक्रम होता. या कार्यक्रमाचे सर्व स्तरातून खूप कौतुक झाले. यापुढे या समाजाभिमुख कार्यक्रमाची आम्ही व्याप्ती वाढविणार आहोत.

आमच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी यावर्षी १९ व्या शतकातील भारत, कन्या वाचवा - देश वाचवा, एड्स, मराठी भाषा, तरुणांचे एकतर्फी प्रेम, मैत्री, आयुष्य अशा विविध विषयांवर मुक्तचिंतनपर लेख लिहिले. 'माय'सारखी वेगळी कथा एका विद्यार्थ्याने लिहिली. तर 'नकुशी'चे नामांतर झालेल्या 'शीतल'ने आपले अनुभव कथन केले आहे. आजपर्यंत महाविद्यालयातील विद्यार्थी फक्त 'प्रेम' या एकाच विषयावर भरभरून लिहायचे; पण हे वर्ष याला अपवाद आहे. यावर्षी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आई, मैत्री या विषयावर खूपच कविता लिहिल्या आहेत. हे लेखन म्हणजे विद्यार्थ्याकडे येणारा समंजसपणा, प्रगल्भता म्हणावी लागेल.



आमच्या महाविद्यालयाच्या प्रगतीचा ध्यास घेणारे मातृ संस्थेचे अध्यक्ष लोकप्रिय आणि कार्यकुशल आमदार मा. के. पी. पाटीलसो, उपाध्यक्ष, मा. ए. वाय. पाटीलसो, कार्यकारी संचालक आर. डी. देसाईसाहेब, सचिव एस. एस. चौगलेसाहेब, सर्व संचालक आणि सभासद यांच्या सहकार्याने आणि प्रोत्साहनाने आम्ही आमची प्रगती करू शकलो हे नमूद करावे लागेल. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजगोळकर सर हे आम्हाला नेहमीच मार्गदर्शन करतात. 'स्पंदन'च्या निर्मितीसाठी संस्थेचे प्रोत्साहन, मा. प्राचार्यांचे मार्गदर्शन, संपादक मंडळ, सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सहकारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि श्रीपाद मुद्रणालयाचे मालक श्री. आर. डी. पाटील (देवाळेकर) व त्यांचे सर्व सहकारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या सर्वांचे मी मन:पूर्वक आभार मानतो. धन्यवाद !

आपलाच

**प्रा. डॉ. संजय दशरथ पाटील**

# माझे मनोगत

दूधसाखर महाविद्यालय हे ग्रामीण भागातील चार तालुक्यांच्या सीमेवर वसलेले, स्वत:ची स्वतंत्र ओळख असलेले व दर्जेदार शिक्षण देणारे महाविद्यालय म्हणून परिसरामध्ये व शिवाजी विद्यापीठात ओळखले जाते. महाविद्यालयाची आजची विद्यार्थी संख्या पाहता (१,२५०) महाविद्यालयाची इमारत व परिसर नजिकच्या काळात अपुरा पडणार असे वाटते. एकंदरीत विद्यार्थिनींच्या दृष्टीने महाविद्यालयाकडे असलेल्या सुविधा पुरेशा असून त्याची कमतरता भविष्यात जाणवणार आहे. चार तालुक्यांमध्ये महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या प्रभावीपणे वाढत आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थी आजच्या जागतिकीकरण, उदात्तीकरण व खाजगीकरणाच्या बदललेल्या परिस्थितीमध्ये स्पर्धेत टिकाव धरेल व भविष्याची वाटचाल विश्वासाने, ध्येयाने व एक सक्षम नागरीक म्हणून करेल, असे वाटते. याच अनुषंगाने महाविद्यालयामध्ये वेगवेगळ्या शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडाविषयक उपक्रम आयोजित केले जातात. सदर धोरणार अनुसरून -

१) संख्याशास्त्र विभागामार्फत दोन दिवसाची निवासी कार्यशाळा बी. एस्सी. भाग-२ च्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आली.

२) शारीरिक क्षमता वाढ याकरिता व सैन्य व सुरक्षा दलामध्ये भरतीसाठी मार्गदर्शन व कार्यशाळा आयोजित केली.

३) व्यक्तिमत्त्व विकास एकाग्रता व मानसिक क्षमता वाढणेसाठी मार्गदर्शन केले.

४) पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण कार्यशाळा व्यवसाय मार्गदर्शन विभागामार्फत सैन्यातील तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

५) एक अनोखा कार्यक्रम महाविद्यालयातर्फे आयोजित केला होता. त्यामध्ये घरामध्ये नकोशा झालेल्या 'नकुशी' नाव असलेल्या तीन मुलींचे बारसे केले व त्यासाठी पालकत्व आमच्या प्राध्यापकांनी स्विकारले. ही एक सामाजिक चळवळ महाविद्यालयाने सुरू केली आहे.

वरील विविध कार्यक्रमांतर्गत आणि विद्यार्थ्यांसमोर आदर्श व्यक्तींचे चरित्र उभे करण्यासाठी चालू शैक्षणिक वर्षामध्ये जवळ-जवळ २० ते २५ शास्त्रज्ञ, साहित्यिक, शिक्षक, सैन्य अधिकारी यांना निमंत्रण केले होते व त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ विद्यार्थ्यांना मिळवून दिला. वरील सर्व तज्ज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनानंतर सैन्य, पोलीस दल, पर्यावरण शास्त्रज्ञ, अनु शास्त्रज्ञ, समाज शास्त्रज्ञ, मुख्याधिकारी होण्याकरिता प्रोत्साहित झाल्याची भावना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसून आली.

महाविद्यालय विद्यार्थ्यांना, प्राध्यापकांना व शिक्षकेतर कर्मचारी यांना वेगवेगळ्या उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करत असते. त्याचाच भाग म्हणून आविष्कार शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे शिबीरामध्ये ५ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. मराठी, विज्ञान परिषदेचे वार्षिक अधिवेशनामध्ये महाविद्यालयाच्या ५ विद्यार्थ्यांनी सलग दुसऱ्या वर्षी भाग घेतला व मिळालेल्या ज्ञानाचा प्रसार भागातील शाळांमध्ये जाऊन केला.

शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वाची गोष्ट म्हणजे, कला व शास्त्र शाखेकडील प्रत्येक १०० विद्यार्थ्यांनी एम. ए. व एम. एस्सी. करिता प्रवेश घेतला आहे आणि उच्च शिक्षणाकडे जाण्याचा मार्ग अवलंबिला आहे.

कॉम्प्युटर सायन्स पदवी घेतलेली दुसरी बॅच बाहेर पडली व जवळ जवळ ८०% विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षणाकरिता पुढे गेले. बी. सी. एस. विभागाकडील पहिली बॅच चालू शैक्षणिक वर्षी बाहेर पडेल.

समाजसेवा व श्रमसंस्कार याकरिता एन. एस. एस. चे वार्षिक शिबीर तळाशी या गावी पार पाडले. विद्यार्थ्यांनी ग्रामपंचायतीच्या मदतीने समाजोपयोगी सेवा केल्या. त्याचबरोबर समाजप्रबोधनही घडवून आणले.

बौद्धिक क्षमतेबरोबर शारीरिक क्षमताही खूप महत्त्वाची असल्यामुळे विविध क्रीडास्पर्धेमध्ये भाग घेण्यास प्रोत्साहित केले जाते. विविध क्रीडा प्रकारामध्ये विद्यार्थी विद्यापीठ व आंतरविद्यापीठ स्तरावर चमकले आहेत. पोहणे, जिम्नॅस्टिक, व्हॉलीबॉल, ॲथलेटिक्स इत्यादी स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांबरोबर प्राध्यापकांनीही यश मिळविले आहे.

महाविद्यालयामधील कायमस्वरूपी ४० टक्के प्राध्यापकांनी पीएच. डी. ही पदवी प्राप्त केली आहे. जवळ जवळ ११ प्राध्यापक पीएच. डी. पदवी प्राप्त करण्याच्या मार्गावर आहेत. अनेक प्राध्यापकांना आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य व विद्यापीठ स्तरावर संशोधनपर लेख सादर करून ज्ञान वाढविण्याच्या प्रक्रियामध्ये मोलाचे सहकार्य दिलेले आहे. काही प्राध्यापकांचे पदार्थशास्त्रातील पेटंटस् स्विकारले गेले आहेत. राज्यस्पर्धा परीक्षा व विद्यापीठ परीक्षा प्रक्रियेमध्ये अनेक प्राध्यापक सहभागी असून आपला कार्याचा वाटा उचलत आहेत. काही माजी विद्यार्थी विदेशामध्ये उच्च शिक्षण घेत आहेत.

वरील सर्व गोष्टीवरून असे दिसून येते की, महाविद्यालयाची यशस्वी वाटचाल चाललेली आहे. विद्यापीठ अनुदान आयोग, राज्य सरकार व केंद्र सरकार आर्थिक अनुदानाचा वाटा मोठा आहे. महाविद्यालय भागातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गरज पूर्ण करण्यास सक्षम आहे. महाविद्यालयाच्या यशामध्ये संस्थेचे अध्यक्ष, मा. आमदार के. पी. पाटीलसो, उपाध्यक्ष, मा. श्री. ए. वाय. पाटीलसो तसेच सर्व संचालक मंडळ, सचिव, कार्यकारी संचालक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांचा मोठा वाटा आहे.

जय हिंद !

**डॉ. आर. एल. राजगोळकर**

प्राचार्य



# दूधसाखर महाविद्यालय, बिद्री

## ध्येय आणि उद्दिष्टे

**ध्येय -**

जागतिक स्पर्धात्मक वातावरणाशी मुकाबला करण्यास ग्रामीण तरुण पिढीला सक्षम बनविण्यासाठी उच्च शिक्षणाचे व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देणे.

**उद्दिष्टे -**

१) ग्रामीण तरुण पिढीला शारीरिक, बौद्धिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या सक्षम बनविणे.

२) उच्च शिक्षणाच्या माध्यमातून उच्च जीवन स्तराची आणि जीवनमानाची ग्वाही देणे.

३) उत्कृष्टतेच्या पाठपुराव्यासाठी शैक्षणिक आणि सामाजिक प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे कॉलेज परिसर आणि समाजामध्ये आयोजन करणे.

४) गतिमान जागतिकीकरण आणि विकासाच्या प्रभावशाली वातावरणामध्ये विद्यार्थ्यांच्या अंगी नैतिक मूल्यांची जपणूक करणे.

## Mission and Goals

**Mission -**

To Provide the broad platform of higher education to rural youth so as to cope up with the globally competitive environment.

**Goals -**

1) To make the rural youth competent physically, intellectually and culturally.

2) To assure the stakeholders better living standards through the means of higher education.

3) For the quest of excellence, to arrange educational and outreach programs in campus and in society as well.

4) To inculcate moral values among the students in the dynamic environment of globalization and development.

> "माझ्या मराठी मातीचा
> लावा ललाटास टिळा,
> हिच्यासंगे जागतील
> दऱ्याखोऱ्यांतील शिळा !"

कसुमाग्रज

# मराठी विभाग

प्रा. डॉ. संजय पाटील

# अनुक्रमणिका

## गद्य विभाग (लेख)


| | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १) एकविसाव्या शतकातील भारत | अमोल पांडूरंग पाटील, बी.एस्सी. । | ३ |
| २) कन्या वाचवा देश वाचवा | कु. सरिता धोंडीराम गुरव, बी.एस्सी. । | ५ |
| ३) सावधान सावधान मानवा, भडकला एड्सचा वणवा !! | कु. रेश्मा रघुनाथ चौगले, बी. ए. ॥ | ६ |
| ४) मराठी असे आमुची मायबोली | अतुल शामराव कुंभार, बी.एस्सी. । | ७ |
| ५) तरुणांचे एकतर्फी प्रेम : एक समस्या परंतु त्यावरील उपाय | कु. सीमा बाबुराव चौगले, बी. ए. ॥ | ९ |
| ६) आयुष्य हे | संतोष राजाराम संकपाळ, बी. ए. ॥ | ११ |
| ७) मैत्री | अस्लम अब्दुल शानेदिवाण, बी. ए. ॥ | १३ |
| ८) चला करिअर करू | स्वप्नील मारुती यादव, बी.एस्सी. ॥। | १५ |
| ९) बे एके बे, बे दुने चूना | कु. सविता वसंत पाटील, बी. ए. ॥। | १६ |
| १०) पुन्हा एकदा त्याच वाटेवर... फक्त तुझ्यासाठी | रणजीत नारायण खाडे, बी.ए. ॥। | १७ |
| ११) माय (कथा) | अभिजीत बाळकृष्ण धुरी, बी. एस्सी. ॥ | १९ |
| १२) मी 'नकुशी'ची झाले हवीहवीशी | कु. शीतल तातोबा चौगले, बी. ए. ॥। | २२ |
| १३) 'नकुशी' नावाच्या विद्यार्थिनींचा नामांतर सोहळा... एक अविस्मरणीय क्षण | प्रा. डॉ. संजय दशरथ पाटील | २४ |
| १६) पावलं पुढं पडली तर | ऋषिकेश विष्णू पाटील, बी. ए. । | ३२ |
| १७) स्वप्ने | कु. अश्विनी आनंदा मगदूम, बी. ए. ॥। | ३२ |
| १८) नशीब | श्रीकांत शंकर बचाट, बी. एस्सी. ॥। | ३३ |
| १९) शब्द | कु. अपर्णा कृष्णात गुरव, बी. ए. ॥ | ३३ |
| २०) मैत्री | कु. सुप्रिया शिवाजी टोपले, बी.ए. ॥ | ३४ |
| २१) मैत्री | कु. अनुराधा अशोक पाटील, बी. ए. ॥ | ३४ |
| २२) मैत्री | सुशांत शिवाजी गुरव, बी. ए. । | ३४ |
| २३) मैत्री | कु. दिपाली शंकर पाटील, बी. ए. ॥ | ३५ |
| २४) मैत्री | कु. तेजस्विनी शांताराम पाटील बी. ए. ॥ | ३५ |
| २५) मैत्री आणि प्रेम | महेश धोंडिराम पाटील, बी. ए. ॥ | ३५ |
| २६) फुलराणी | रोहित रविंद्र पाटील, बी. एस्सी. ॥। | ३६ |
| २७) व्यथा एका देठाची | आनंदा अशोक सासमिले, बी. ए. ॥। | ३६ |
| २८) तुझी आठवण | विशाल बाजीराव चौगले, बी. ए. । | ३६ |
| २९) आर्त साद | कु. ऋतुजा सिताराम पाटील, बी. एस्सी. ॥ | ३७ |
| ३०) नातं तुझं माझं | कु. वैशाली विश्वास खोत, बी. ए. ॥। | ३७ |
| ३१) प्रेम म्हणजे | रविंद्र दशरथ चौगले, बी.सी.एस. ॥। | ३८ |
| ३२) मी प्रेम केलं | प्रवीण मधुकर पाटील, बी. ए. ॥। | ३८ |
| ३३) सुटणारच असते साथ कधीतरी | सचिन हिंदूराव चौगले, बी. एस्सी. ॥ | ३९ |


## पद्य विभाग (कविता)


| | | |
|---|---|---|
| १) स्वागत | नितीन साताप्पा फराकटे, बी. ए. ॥। | २६ |
| २) भारत गौरव | दिगंबर कृष्णात भावके, बी. ए. ॥। | २६ |
| ३) मी मायबोली (मराठी) | उमेश हणमंत कुंभार, बी.एस्सी. ॥। | २७ |
| ४) नशीब आम्ही इथे जन्मलो | सचिन राजाराम फराकटे, बी. ए. ॥। | २७ |
| ५) लेकरासाठी | कु. पूनम श्रावण चोपडे, बी.एस्सी. । | २८ |
| ६) आई | मारुती नामदेव परीट, बी. ए. ॥ | २८ |
| ७) तू मला प्रिय आहेस आई | कु. पूनम दिगंबर कुरडे, बी.एस्सी. ॥ | २९ |
| ८) आई | कु. ऋतुजा बाबूराव कोपार्डेकर, बी.ए.॥ | २९ |
| ९) माझी ताई | कु. वर्षाराणी सर्जेराव काशिद, बी. ए. ॥ | २९ |
| १०) वेळ नाही | कु. जयश्री संभाजी पाटील, बी. एस्सी. । | २९ |
| ११) अरे कसलं लेकाओ माणूस तुम्ही | शहाजी चंद्रकांत गोंगाणे, बी.ए. ॥। | ३० |
| १२) जीवन एवढं आहे का स्वस्त ? | कु. दिपाली जयसिंग पाटील, बी. एस्सी. । | ३० |
| १३) जीवन | कु. पूनम रघुनाथ मांगले, बी. ए. । | ३१ |
| १४) वेड लागलं माणसाला ! | शाहू बाबुराव कांबळे, बी. ए. ॥ | ३१ |
| १५) जीवनाची लढाई | प्रवीण रामचंद्र एकशिंगे, बी. ए. ॥। | ३१ |


## इतर


| | | |
|---|---|---|
| १) विद्यार्थ्यांचे वार्षिक नियोजन | अमोल देसाई, बी. एस्सी. । | ३९ |
| २) शायरी | दिगंबर केरबा पाटील, बी. ए. ॥ | ४० |
| ३) चारोळ्या | निलेश विलास माने, बी. ए. ॥ | ४० |


## कला-कौशल्य रेखाचित्रे


| | |
|---|---|
| १) अक्षय आनंदा पाटील, बी. एस्सी. । | ४१ |
| २) कु. पूनम महादेव पाटील, बी. एस्सी. । | ४१ |
| ३) कु. ऋतुजा, बी. एस्सी. ॥ | ४२ |

# गद्य विभाग

## ।। एकविसाव्या शतकातील भारत ।।

''या धरतीला या मातीचा मृत्यूंजय अभिमान
उदात्त उज्वल, सुंदर, मंगल, भारत देश महान.''

खरं तर भारत ही संतांची भूमी. हा देश सोनं नाही; पण सोन्यासारखी माणसे निर्माण करणारा आहे. प्रभू रामचंद्रांच्या निष्ठेने पावन झालेली, योगी ज्ञानेश्वरांच्या पसायदानाने पुलकित झालेली व गांधींच्या सत्याच्या पायावर उभी असलेली ही भारत भूमी !

भारत राज्याच्या पदस्पर्शाने या भूमीचे 'भारत' असे नामकरण झाले. सुरुवातीचा काळ पाहताना या देशावर अनेक परकीय सत्तांनी जुलूम केला. डच, पोर्तुगीज, इंग्रज या सर्वांनी या भूमीला गुलाम बनविले. या भूमीने पारतंत्र्याची काळी कारकीर्द अनुभवली; पण या मातीच्या सुपूत्रांनी आपल्या कर्तव्याला जागून इंग्रजी सत्तेला आव्हान दिले आणि १५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्याचा प्रकाश दाखविला.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५० पासून या देशात 'लोकशाही' नावाची नववधू माप ओलांडून आत आली आणि घटनेने राज्यकारभार सुरू केला. काळ पुढे सरकत जात २१ वे शतक आले. त्यावेळी या भूमीच्या कारकिर्दीचा इतिहास लक्षात आला. आज २१ व्या शतकातला भारत पाहताना स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारकांनी स्वत:च्या घरादाराची केलेली होळी पहिल्यांदा दिसते. तोच वारसा २१ व्या शतकातल्या भारतवासियांनी समर्थपणे पेलला आहे ही नक्कीच अभिमानाची गोष्ट आहे.

आजच्या घडीला भारताकडे विकसनशील देश म्हणून पाहिले जाते. कला, क्रीडा, साहित्य, संस्कृती, राजकारण, अर्थकारण, समाजकारण या सर्व क्षेत्रात भारताची कामगिरी कौतुकास्पद आहे. अर्थात, या यशापाठीमागे अथक परिश्रमांची जोड आहे, हे कदापि विसरून चालणार नाही.

काही दिवसांपूर्वी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी भारत भेटीत भारताला 'महासत्ता' असे संबोधले. यावरून भारताच्या प्रगतीचा उधळलेला चौखूर वारू लक्षात येतो. ज्या राष्ट्रात स्त्री ही अबला समजली जात होती त्याच राष्ट्रात प्रतिभाताई पाटील महिला राष्ट्रपती होतात, हा २१ व्या शतकातील भारताचा विजय समजावा लागेल. भारताच्या कला व साहित्य क्षेत्राचा विचार करताना भारताची प्रगती उल्लेखनीय आहे. वि. स. खांडेकरांपासून विं. दां. पर्यंतचा 'ज्ञानपीठ' प्रवास नक्कीच भारतीयांची गौरवगाथा आहे.

या आधुनिक युगात अमेरिका, चीन या राष्ट्रांबरोबर स्पर्धा करताना भारताने आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. आर्थिक धोरणांचा विचार करताना भारतीय शासन कमजोर ठरत असले तरीही उदासीन नाही. जागतिक बाजारपेठेत भारतीय वस्तूंचे व्यापारीकरण प्रचंड आहे. धान्य उत्पादनात 'जगाचा पोशिंदा' म्हणून भारताला ओळखले जाते. २०११ चा देशाचा अर्थसंकल्प पाहता, सर्वसामान्यांना जगणं सुसह्य करण्याचा प्रयत्न शासनाचा दिसून येतो.

भारताचा क्रीडा क्षेत्रात तर प्रचंड दबदबा आज निर्माण झाला आहे. २८ वर्षांच्या तपश्चर्येनंतर क्रिकेटमध्ये भारताने विश्वचषकावर नाव कोरले आहे. राजवर्धन राठोड, अभिनव बिंद्रापासून तेजस्विनी सावंत,

सायना नेहवाल हा क्रीडा क्षेत्राचा यशस्वी प्रवास थक्क करणारा आहे. देशाचा भौगोलिक विस्तार, सीमा पाहता व वाढती लोकसंख्या यांचे गुणोत्तर विषम असले तरीही इथले लोक गुण्यागोविंदाने नांदतात. हा ऐतिहासिक पराक्रम इथे घडतो आहे. जगाच्या पाठीवर सक्षम लोकसंख्या असणारा भारत हा एकमेव देश आहे. २१ व्या शतकात भारताचा सर्वांगीण विकास हा महासत्तेच्या दिशेने सुरू आहे. परकीय चलनात झालेली वाढ, व्यापारीकरण, जागतिक बाजारपेठेत भारताचे स्थान, मुक्त अर्थव्यवस्था, संतुलित होत चाललेली लोकसंख्या व सर्व क्षेत्रात घोडदौड हे २१ व्या शतकातील भारताचे चित्र आहे. प्रशासकीय सेवेत भारताचे ग्रामीण तरुण आपला ठसा उमटवत आहेत. मध्यंतरी भारत-अमेरिका, फ्रान्स, रशिया यांचेशी झालेला अनुकरार, परिषदा हा भारतीय महासत्तेचा पुरावा समजावा लागेल.

पण आजही भारत पूर्ण प्रगतशील दिसत नाही. कारण इथे भारत विरुद्ध इंडिया असा संघर्ष सुरू आहे. गरीबाला सकाळ-संध्याकाळच्या जेवणाची भ्रांत पडली आहे. तर भुकेने तळमळणारी असंख्य जनता या भारतात आहे. गरीबाचं पोरगं आय. टी. आय. मध्ये शिक्षण घेतयं, तर श्रीमंताचं पोरगं आय. आय. टी. मध्ये शिक्षण घेतंय. ही इथली दरी आज नष्ट झालेली नाही. २१ व्या शतकातही भारतात दहशतवाद, नक्षलवाद, जातीयवाद थोपवण्याचं सामर्थ्य प्राप्त झालेलं नाही. भ्रष्टाचार हा शिष्टाचार बनलाय आणि सर्वसामान्य माणूस जगण्याची उमेद हरवून बसलाय, मग प्रश्न पडतो, २१ व्या शतकातला सर्वांग सुंदर भारत हाच का ?

पण हे चित्र बदलणे शक्य आहे. कृषिप्रधान भारतातल्या शेतकऱ्याला पहिल्यांदा समृद्ध करणे गरजेचे आहे. जर राष्ट्राची प्रगती साधावयाची असेल तर इथल्या भारतीयांनी त्यादृष्टीने पावलं उचलणे गरजेचे आहे. देश माझ्यासाठी काय करतो ? यापेक्षा मी देशासाठी काय करतो ? याचा विचार करणे गरजेचे आहे. देशाला २१ व्या शतकात महासत्ता बनवायचे असेल तर विकासाची भूमिका इथं तयार झाली पाहिजे. सर्वसामान्य माणसापासून सर्वजणांनी विकासासाठी हातभार लावला पाहिजे. एक अण्णा हजारे जन्माला आले तर काय क्रांती होऊ शकते, हे संपूर्ण जगाने अनुभवले आहे. फक्त एका अण्णांनी लढून चालणार नाही. भारताच्या १२१ कोटी लोकांनी जर विकासाच्या दृष्टीने एक पाऊल टाकलं तर विचार करा काय क्रांती होईल ?

"बलसागर भारत होवो,
विश्वात शोभूनी राहो ।"

ही उक्ती सार्थ बनविण्यासाठी आता भारतीय म्हणून देशासाठी जगूया व देशासाठी मरूया. आजच्या घडीला देशाला महासत्तेपासून कोणीही रोखू शकत नाही. जगाच्या पाठीवर सर्वाधिक युवकांचा भारत हा एकमेव देश आहे. त्या युवकांनी राष्ट्रासाठी समर्पित होण्याचा संकल्प करूया. हा देश माझा आहे हा विचार मनात आणून देशासाठी काहीतरी मदत करूया.

मान्य आहे, सर्वांना गांधी होता येत नाही, तरीही त्यांच्या हातातल्या काठीने आपण या विकासाच्या गाडीला टेकू दिला तर २१ व्या शतकातला भारत 'महासत्ता', 'बलशाली' व 'सर्वांग सुंदर' झाल्याशिवाय राहणार नाही हे नक्की !

'हे दणकट आमुचे बाहू,
हे मजबूत दोन्ही पाय
असता प्रत्येकाची निधडी छाती
सांगा, या धरतीवरती
तुम्हा-आम्हाला उणे हो काय .... ?'

अमोल पांडूरंग पाटील
बी. एस्सी. ।

# "कन्या वाचवा, देश वाचवा"

तू जगजीवनी, तू कामिनी, तू स्वामिनी, तू दामिनी ! ती म्हणजे स्त्री ही विविध भूमिका पार पाडत असते. ती कुणाची आई असते, कुणाची पत्नी, कुणाची मुलगी तर कुणाची आजी असते. अशा विविध रूपातून ती आपल्याला दिसत असते; पण आजच्या युगात स्त्री भ्रूण हत्या फार मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. लोकांना वाटते, मुलगा वंशाचा दिवा आहे व मुलगी परक्याचं धन आहे. पण समाजाने विसरता कामा नये. मुलगी ही दोन्ही घराचा उद्धार करते सासर व माहेर ! त्यामुळे मला असे वाटते की,

''बेटी ही धनाची पेटी''

समाजाने जरा विचार केला पाहिजे, जर स्त्री भ्रूण हत्या वाढत गेली तर.....

नातवाला गोष्ट सांगणारी आजी कशी मिळणार ? मुलावर माया करणारी प्रेमळ आई कशी मिळणार ? पतीला साथ देणारी जीवनसाथी पत्नी कशी मिळणार ? भावाला गोड बहीण कशी मिळणार ?

हा सर्व विचार समाजाने केला पाहिजे. तेव्हा कुठे ही स्त्री भ्रूण हत्या थांबू शकते. आपण जगाला आपल्या देशाचे 'स्त्री-पुरुष समानता' हे तत्त्व खऱ्या अर्थाने पटवून देऊ शकतो.

स्त्री सुद्धा आता पुढारलेली आहे. ती सुद्धा पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे. प्रत्येक क्षेत्रात स्त्री दिसत आहे. ती सुद्धा सक्षम स्त्री बनली आहे. तरी सुद्धा लोकांना मुलगीचा जन्म नको असतो. ती मुलगी आहे, वडिलांच्या घरात आयुष्य काढू शकत नाही ? की, जातीने मुलगी आहे म्हणून ? का ? ह्या सर्व प्रश्नांचा सारासार विचार केल्यावर समजते की, मुलगी महत्त्वाची किती आहे.

मुलगा हा 'सुपारी'सारखा असतो. तो कधी किडका निघेल हे सांगता येत नाही. मुलगा शिकून-सवरून शहरात राहायला जातो. पण इकडे गावात त्यांचे आई-वडील असतात याचा त्याला विसर पडतो. पण मुलगी सासरला गेली असते तेव्हा सुद्धा ती वरचेवर आई-वडिलांची खुशाली विचारत असते. हे सर्व करून सुद्धा समाज तिला मुलग्याएवढे महत्त्व देत नाही. मुलग्याने जरी म्हातारपणी आधार काढून घेतला तरी त्यांना त्यांचा मुलगाच प्रिय असतो. कारण तो त्यांचा वंश पुढे चालवणार असतो. त्यांचं नाव पुढं राहणार असतं. पण समाजाने सारासार विचार करायला हवा. कारण मुलगीच जन्मदायिनी असते, देवानेच तिला हे वरदान दिले आहे. म्हणजे देवाचा सुद्धा स्त्रीवर किती विश्वास आहे, हे दिसून येते.

फक्त भारतात विरोधाभास दिसून येते. दुसऱ्या राष्ट्रात हे एवढे विरोधाभास मुलगा-मुलगी यामध्ये दिसून येत नाही. भारतातील आई-वडीलच हे मुलग्याचे काम, हे मुलगीचं काम असं म्हणतात. यामुळे मुलगा-मुलगी यामध्ये भेदभाव वाढत राहतो; पण दुसऱ्या देशातील लोक तसे करत नाहीत. जेवताना सुद्धा मेजावर भांडी पुरुष आणतात, मग स्त्री जेवण वाढते. प्रत्येकजण आपल्याला दिलेले काम करत असतात. पण आपल्या भारतात प्रथम पुरुष जेवतात. पुरुष जेवल्याशिवाय स्त्री जेवत नाही. सगळी घरातील कामे स्त्रियाच पाहतात त्यामुळे त्यांना बाहेरच्या जगातील ज्ञानाशी काडीमात्र संबंध येत नाही. यामुळेच ती मागे पडत आहे. सगळ्या सुविधांपासून वंचित राहत आहे. तिचा विकास खुंटला आहे. आपल्या भारत सरकारने 'लेक लाडकी' अभियान सुरू केले. तरी सुद्धा लोक कळ्या उमलण्या आधीच खुडतात. हा गुन्हा आहे हे माहीत असून सुद्धा ते या कृत्याकडे वळतात. त्यांना या निष्पाप जीवांचा बळी देताना काहीच वाटत नाही. या लोकांच्यामुळे देशाची प्रगती खुंटली आहे. म्हणून समाजाने विचार करून या स्त्री भ्रूण हत्येला आळा घातला पाहिजे. म्हणजेच आपल्या देशात स्त्री-पुरुष समानता होईल. पुरुषांच्या कामाला स्त्रीची सुद्धा जोड मिळेल व आपला देश प्रगतीपथावर जाईल. म्हणून मला वाटते,

SAVE THE BABY GIRL ! SAVE THE COUNTRY !!

**कु. सरिता धोंडीराम गुरव**

बी. एस्सी. ।

# सावधान - सावधान मानवा, भडकला, एड्सचा वणवा !!

मित्रांनो, हेच वय असतं उमलायचं, फुलायचं, झुलायचं आणि झुलवायचही ! या वयात करायचं असतं सर्व काही, मिळवायचं आणि गमवायचं ! असे हे वय ! पण काय मिळवायचं आणि काय गमवायचं हे समजलं की झाले ? पण या कमवायच्या  वयात हवे त्या ऐवजी नको ते कमवतो आणि आयुष्य गमवतो. मग वाट्याला येतो तो, एड्ससारखा महाभयंकर वणवा !! मग प्रश्न पडतो 'एड्स' म्हणजे नेमके काय ?

एड्स म्हणजे ढोबळपणे असे म्हणता येईल प्रतिकार शक्तीचा ऱ्हास. पण एवढ्या संकुचित अर्थाने आपण एड्सची व्याख्या करणे संयुक्तिक होणार नाही, एड्स म्हणजे अनेक रोगांना समूह 'एच. आय. व्ही.' या विषाणूमुळे शरीरातील रोग प्रतिकारक शक्ती हळूहळू कमी होते आणि शरीर अनेक रोगांचा बळी पडते. एड्समधला ए म्हणजे अॅक्वायर्ड, आय म्हणजे इम्युनो, डी म्हणजे डिफिसियन्सी, एस म्हणजे सिन्ड्रोम. या सर्वांचा अर्थ एकच की हा रोग अचानक होत नाही. तो कुणाकडून तरी संक्रमित केला जातो. म्हणजेच मिळवला जातो. मातेकडून मुलाला असेल, पुरुषाकडून स्त्रीकडे असेल किंवा स्त्रीकडून पुरुषाकडे असेल असा भयानक रोग दिला जातो आणि घेतला जातो. म्हणूनच देणाऱ्याने आणि घेणाऱ्याने विचारपूर्वक पावले उचलली पाहिजेत.

लग्नापूर्वी हनुमानासारखे तर लग्नानंतर प्रभू रामचंद्रासारखे राहिले पाहिजे. म्हणजे लग्नापर्यंत ब्रह्मचर्य व्रताचे पालन केले पाहिजे. तर लग्नानंतर प्रभू रामचंद्रासारखे एक पत्नीव्रत अंगिकारले पाहिजे.

मित्रांनो, एक गोष्ट लक्षात ठेवा, जीवन एकदाच मिळते, हे जग मी सुंदर करून जाईन. माझ्या जाण्याने इतर लोक हळहळतील यांची काळजी घ्या. त्यासाठी नैतिक पातळीवर आपले चारित्र्य स्वच्छ आणि निष्कलंक कसे राहील याची काळजी घ्या. तरुण स्त्री-पुरुषांनी प्रेमजीवनामध्ये शरीर सुखाचा भाग अतिशय महत्त्वाचा मानला पाहिजे. परस्परांच्या आनंद संवर्धनाकरिता आपण एकमेकांचे हात हातात घेतले आहेत आणि म्हणूनच हे हात कायम घट्ट राहिले पाहिजेत. ते एकमेकाला एकनिष्ठ असल्याची ग्वाही देणारे असले पाहिजेत. आयुष्याच्या प्रवासातील खरी मजा सोबतीतच आहे आणि म्हणून एकमेकाला आयुष्यभर चांगली सोबत दिली पाहिजे याची काळजी घ्या. शेवटी  पाडगांवकरांच्या भाषेत

जीवन म्हणजे काय तर ? काटेरी डंख आहेत.

डोळे उघडून पहा, ते तर फुलपाखराचे पंख आहेत.

**कु. रेश्मा रघुनाथ चौगले**

# मराठी असे आमुची मायबोली

''माझ्या मराठी भोषस
नका म्हणू हिन-दिन
स्वर्गाहूनी थोर
महा हिचे महिमान''

कुसुमाग्रजांच्या या चार ओळी मराठीपणाचं महत्त्व सांगून जातात.

पण खरंच 'हॅलो' म्हणून अभिवादन करण्यापेक्षा 'नमस्कार' हा शब्द किती गोडवा देतो नाही ! खळखळून हसायला लावणारी आणि चटकन डोळ्यात पाणी आणते ती मराठी ! मराठी म्हणजे साहित्यिकांचा खरा अभिमान मग 'सप्तरस एका कुपीत जरी भरले तरी त्याची तुलना मराठी भाषेशी होऊ शकणार नाही.' असे म्हणणारे ज्ञानेश्वर काय किंवा 'मी मराठी भाषेच्याच आधारस्तंभावर जगलो' असे म्हणणारे पु. ल. देशपांडे काय. मराठी भाषेचं महत्त्व शब्दबद्ध होऊच शकत नाही. 'राम-राम पाव्हणं' म्हणण्यात काय मजा असते ती मराठी भाषिकांनाच माहीत. ऋतूमध्ये जसा पाऊस, माणसांमध्ये जशी आपुलकी, जीवनात जसं हसून, मरणात जसं अश्रू त्यापेक्षाही महत्त्वाचं स्थान आहे आपल्या मायबोली मराठीचं. मराठी मन, मराठी माती, मराठी माणूस, मराठी रंगभूमी या साऱ्या समिधांशिवाय मायबोलीच आपलेपण अपुरच ठरतं.

'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' असे म्हणणारे टिळक मराठी शब्दांच्या धारधार शस्त्राच्या जोरावर आपली प्रतिमा अढळ करून गेले. 'घन:श्याम सुंदरा श्रीदरा अरुणोदय झाला' या भूपाळीत होनाजी बाळांनी मराठी कवितेची सुप्रभात केली. सिनेतारकांना मंत्रमुग्ध करून सोडणारा दादासाहेब फाळक्यांचा 'राजा हरिश्चंद्र' याच मायबोली मराठीत घडला. 'आम्हा घरी धन शब्दांचिच रत्ने' असे म्हणणारे तुकोबा मराठी शब्दांना आपले शस्त्र आणि अस्त्र ही मानतात. केशवसुतांनी आपल्या मराठी कवितांनी नव्या मनुच्या आगमनाची वर्दी दिली तर बालकवींनी आपल्या मराठी काव्याने निसर्ग सौंदर्याचा नजराणाच पेश केला.

''मी शब्दांच्या घालूनी बसलो अमाप राशी
धावत जातो जखमी होता शब्दांपाशी''

असे म्हणणारे कुसुमाग्रज मराठीला आपली सखी मानतात. मंगेश पाडगांवकर एके ठिकाणी मराठीबद्दल म्हणतात, 'अनुभवाच्या प्रत्येक वळणावर माझी मराठी माय मला विविध रूपात दिसते. ती कधी अन्यायी पहाडाच्या ठिकऱ्या-ठिकऱ्या उडवणाऱ्या सुरुंगासारखी होती तर कधी महात्मा गांधी, मार्टीन ल्यूथर किंग यांच्या ह्दयातील जखमा व्यक्त करणारी होती.''

मग, अशा आपल्या मायबोलीला एकाएकी दृष्टच लागली. 'देअर इज अ तुलसी वृंदावन इन आवर कोर्टयार्ड' हे इंग्रजी वाक्य मराठी मातीत जन्मलेल्या आणि मराठी मातीत मिसळणाऱ्यांच्या तोंडातून ऐकताना

माझी मराठी माय वांझ तर झाली नाही ना ? असा प्रश्न पडतो. आजकाल मराठी बोलण्यापेक्षा इंग्रजी बोलण्याला, मराठी शिक्षणापेक्षा इंग्रजी शिक्षणाला अवास्तव महत्त्व दिलं जातं. याचा अर्थ असा नाही की, इंग्रजी शिकू नये, जरूर शिकावं. कारण ती आज काळाची गरज ठरत आहे. पण या भाषेच्या भाऊगर्दीत आपण आपल्या मराठीला विसरता कामा नये. लोकमान्य टिळकांनी १९०४ च्या 'केसरी' च्या अग्रलेखात मराठी भाषिकांची चिंता व्यक्त केली होती. ती खंत आजही कायम आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर नेहमी म्हणायचे तीन गोष्टींबद्दल अभिमान बाळगा स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा. मग आपण आपल्या मायबोलीविषयी अभिमान बाळगायला काय हरकत आहे ?

पण कितीही झालं, कितीही जमाना बदलला तरी आईचं महत्त्व कमी होत नाही. त्याचप्रमाणे माझ्या मायबोलीचं महत्त्व कमी होणार नाही. मराठी वाचक म्हणजे जणू विझलेल्या आगीतले निखारेच. त्यांच्यात ताकद आहे वणवा पेटवण्याची. त्यांच्यामुळेच या मायबोलीची धग होत आहे आणि यापुढे होत राहील. म्हणून शेवटी सुरेश भटांच्याच ओळीत सांगतो,

''करू नका चर्चा एवढ्यात पराभवाची
रणात आहेत अजूनही झुंजणारे
विझूनी माझी चिता युगे लोटली तरी
विझायचे राहिलेत निखारे अजून काही''

हेच राहिलेले निखारे म्हणजे तुम्ही-आम्ही मराठी वाचक.

'धन्य मराठी
शून्य मायबोली'

**अतुल शामराव कुंभार**
बी. एस्सी. ।

# तरुणांचे एकतर्फी प्रेम : एक समस्या व उपाय

प्रेम ! किती साधा व सरळ शब्द. उच्चारताक्षणीच कुणासाठीही निर्माण व्हावा असा अडीच अक्षरी शब्द ! प्रेम मग ते कुणावरचेही असो, आई-वडिलांवरील, भावा-बहिणींवरील, आजोबा-आजीवरील, परमेश्वराचा ठेवा असणारे ज्ञान मिळणे शक्य होतं अशा गुरुजनांवरील, निष्पाप प्राणीमात्रावरील, एखाद्या कृत्रिम वस्तूवरील अथवा सभोवतालच्या सर्वांगसुंदर निसर्गावरील....!

प्रेम करण्यासाठी अमुक एक व्यक्ती पाहिजे किंवा लागते असे काही होत नाही. प्रेम करणारा असेल तर, प्रेम करण्यासाठी त्याला प्रेमळ, प्रेमास योग्य अशीच एखादी वस्तू अथवा व्यक्ती असेल तर बस्स ! एखादी वस्तू आपल्याला आवडते म्हणून आपले तिच्यावर प्रेम असते असे नाही तर आपले त्या वस्तूवर प्रेम असते; म्हणूनच ती वस्तू आपल्याला आवडते हीच तर प्रेमाची नितांत सुंदर व्याख्या. हीच व्याख्या आजकाल तरुण वर्गाच्या प्रेम करण्याच्या व त्यासाठी विकृत बनण्याच्या अवस्थेला कारणीभूत आहे. तरुण वर्ग निव्वळ उत्साहाचा झरा असतो. म्हणतात ना 'उथळ पाण्याचा खळखळाट फार' त्याप्रमाणे अंगातील सळसळतं रक्त, स्वत:मधील प्रचंड आत्मविश्वास, दुसऱ्याचे तत्त्वज्ञान फिकं पाडण्याची उमेद यामुळे ही तरुणाई 'लाथ मारेल तिथे पाणी काढेल' एवढ्या ताकदीची व आत्मविश्वासाची असते. त्यांच्यामध्ये 'Yes, I can do it' हेच ब्रीद असते. त्यामुळे तरुणाईत कोणतीही अशक्य गोष्ट साध्य होऊ शकते. आपल्या वश होऊ शकते.

प्रेम करणे ही मानवाची प्रकृती आहे विकृती नव्हे ! आजचा तरुण भरकटला जातोय त्यामुळे सावधान ! प्रेमाची व्याख्या बदलली जाते आहे. या बदलत्या फॅशनच्या युगात प्रेम म्हणजे 'टाईमपास' झाले आहे आणि या टाईमपाससाठी तरुण वर्गात हल्ली जीवघेणी स्पर्धा सुरू झाली आहे. हल्लीचा विकृत तरुण हा एकतर्फी प्रेमातूनच निर्माण होतो. त्याच्या वयाच्या मुलींच्या सहवासात वावरताना एखाद्या मुलीवर प्रेम जडते व त्याची अवस्था हिंदी चित्रपटांतील प्रेमात पडलेल्या नायकासारखी होते. त्या नायकाच्या तोडीस तोड म्हणून की काय कुणास ठाऊक आजच्या तरुणात जणू स्पर्धाच चाललीय 'हिरो' बनण्यासाठी ! समाजात वावरताना अशी अनेक प्रसारमाध्यमे आजच्या तरुणाला उपलब्ध होतात जी एकतर्फी प्रेमाचा प्रसार करतात. प्रेमाच्या व्याख्येचे विडंबन करतात, त्यांच्या या दर्पोक्तीला आजचा तरुण बळी पडतो आहे. कॉलेज करणाऱ्या तरुणांमध्येच एकतर्फी प्रेम व त्यांची विकृतावस्था हा प्रकार जास्त आढळतो. कारण हे तरुण वास्तव जीवनाचे भान विसरून कल्पित जीवनाचा आनंद घेण्यात मग्न असतात. पण 'कल्पिताहुनि वास्तव श्रेष्ठ !' हे जीवनावश्यक तत्त्वज्ञान तो बहुदा विसरलाच आहे.

एकतर्फी प्रेमावर; आपल्या व्यक्तिमत्त्वावर हा वर्ग भलताच खुष असतो. प्रेमाच्या अथांग सागरात तो अखंड बुडतो आहे. समुद्र सुख चाखण्यासाठी त्या प्रेमसागरातील एकेक मधूर लाट अनुभवण्यासाठी तो धडपडतो आहे. पण कितीही झाले तरी आजच्या तरुणाईचे प्रेम निव्वळ आकर्षणातून व एकमेकांवरील कुरघोडी करण्याच्या प्रयत्नातूनच झालेले असते. आपले प्रेम आजमावण्यासाठी आजचा तरुण धडपडतो आहे. पण त्याला प्रतिसाद मिळत नाही. कारण त्याचं प्रेम एकतर्फी व विकलांग असते. दोन मिनिटांत आजच्या तरुण वर्गाच्या प्रेम प्रकृतीचं विकृतीत रूपांतर होतं. स्वत:च्या होकाराला होकार न मिळाल्यामुळे त्याचा पुरता निरस

होतो आहे. त्यामुळे तरुण वर्गात पुरती सूड भावना जन्म घेऊ लागते. 'तू मेरे सिवाय और किसी की हो नहीं सकती' या हिंदी चित्रपटातील 'पेटंट' असणाऱ्या संवादाप्रमाणे आजचा तरुण वावरतो आहे. त्याच्या मनाची जी विकृत अवस्था आहे ती कधी कधी प्रकटही झालेली आपल्याला पाहायला मिळते. अमृता देशपांडे, विद्या गायकवाड या तरुणी अशाच विकृतावस्थेचा बळी गेलेली उदाहरणे आहेत. आजची ही तरुणाई जलद जीवनक्रम जगण्याच्या व झटपट आपले उद्देश साध्य करण्याच्या खटपटीत आहे. स्वतःच्या मनाला कुणाच्याही मनाची पर्वा न करण्याची सवय लागलेली ही आजची तरुणाई. कशाचाही सूक्ष्म विचार न करता, कशाचाही संयम न राखता एकतर्फी प्रेमातून विकृतावस्थेत ढकलली जात आहे. यासाठी काही अंशी तरुणींचाही संबंध असतोच. पण नव्वद टक्के वाटा तरुणांचा आहे हे सिद्ध झाले आहे, नव्हे ते खरे आहे.

बदलतं धावपळीचं जग, बदलती फॅशनची जादूई करामत यामुळे चांगल्या संस्कारांची ओळख आजच्या तरुण वर्गाला झालेली दिसत नाही. चांगले संस्कार शिकून घेण्याची प्रवृत्तीही फारच थोड्या तरुणांची असते. पण सर्वच तरुणांची ती मक्तेदारी राहिलेली नाही. हे त्यांच्या आचरणातून, मस्ती करण्याच्या स्वभावावरून सिद्ध होते आहे. स्वतःमध्ये फार चांगला बदल घडवून आणण्यास व एकतर्फी प्रेमातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीस आळा घालण्यास हाच विकलांग तरुण वर्ग स्वतःच्या आत्मविश्वासाच्या जोरावर समर्थ होऊ शकतो. पण हे शक्य आहे त्यांच्या शिकवणीतून आजच्या तरुण वर्गाला इतरत्र भंडावून न सोडता त्यांना राष्ट्राच्या, स्वतःच्या भावी आयुष्यातील सुसंस्कृत नागरिकाच्या ओळखी करून देऊन 'एक आदर्श तरुणाई' निर्माण करण्यास भाग पाडावे लागेल.

आजच्या तरुणाईने स्वतःच्या सळसळत्या उत्साह मेरूला थोडा लगाम घालून, तो रोखून येणाऱ्या आपल्या सारख्याच भावा-बहिणींसाठी 'आदर्श तरुणाई'ची बीजे रोवून स्वतःची खरी ओळख करून घ्यायला हवी.

या स्वतःच्या, आजच्या तरुणाईचा हा आत्मसन्मानाचा एक आशेचा प्रयत्न 'हिच तर खरी तरुणाई !' हा सार्थ-भावार्थ नक्कीच खरा ठरवेल, एवढीच आशा आहे.

**कु. सीमा बाबुराव चौगले**

बी. ए. ॥



# आयुष्य हे....

मला नेहमीच प्रश्न पडतो की, आयुष्य... आयुष्य म्हणजे तरी काय.....? आयुष्यामध्ये आपण कोणाचे असतो ? आणि आपले कोण असते ? पण आपल्या आयुष्याची वाट ही खूपच दूरवर आहे. आपल्या आयुष्याच्या वाटेवर अंधार आहे, काटे आहेत आणि थोडा प्रकाश देखील आहे. आपण वाटेवरून चालत असताना अनेक वळणे येतात व अनेक छोटे-मोठे रस्ते मिळतात. त्या रस्त्यावरून चालत असताना आपल्याला अनेक सवंगडी भेटतात. पण हे मित्र-मैत्रिणी यांचा सहवास केवळ काही क्षणांचा असतो. जोपर्यंत आपल्या वाटेवर प्रकाश आहे तोपर्यंत सारेजण सोबत पण ज्यावेळेस आपल्या वाटेमध्ये काटे, अंधार येत राहतील, तस-तसे मित्र-मैत्रिणी सारेच प्रत्येक वळणाच्या सोबत निघून जातात. पण ते असे जातात की, ते कधी आलेच नाहीत आणि पुन्हा येणारही नाहीत. कालांतराने आपण शेवटी एकटेच राहतो. तसेच आयुष्यामध्ये ज्याचे प्रश्न त्याने स्वत:च सोडवायचे असतात. कारण प्रश्न निर्माण करणारी माणसे ही आपलीच असतात. त्यामुळे त्यांना बोलताही येत नाही आणि तोडताही येत नाही. कारण देवाने हीच नाती रक्ताने जोडलेली असतात. आपण आपल्या आयुष्याची सुरुवात एकट्यानेच का करू नये ? कारण सुरुवात अगदी आनंदाने आणि शेवट मात्र त्रासाने. शेवटी त्रास सोसण्यापेक्षा आपण आपली सुरुवातच त्रासामधून केलेलीच चांगली ना ? ''कारण जीवन हे देवालय नाही, ते एक रणांगण आहे.'' कारण आजकाल जग शक्तीवर चालते आणि स्पर्धेवर जगते.

आजच्या जीवनाला फार वेग आलेला आहे. कारण वेगवान जीवन जगणारे लोक सर्वच कामे वेगाने करतात. स्नान करणे, कपडे घालणेसुद्धा घाईने करतील. पाच मिनिटांत जेवून गाडी पकडण्यास धावतील, हे अतिशय धावपळीचे जीवन जगतात. श्रीमंती आणि वैभव मिळालेल्या लोकांत मिनिटा-मिनिटांच्या हिशेबाने जगणारे खूपच लोक आहेत. कितीही पैसा मिळविला तरी त्यांचे समाधान होत नाही आणि ते सावकाश कोणतीही गोष्ट करत नाहीत. खूपच उपभोग घेतात. पण समोर लोकांचे भले करण्याचे ध्येय नसल्याने त्यांच्यासमोर पुढे काय .....? हा प्रश्न उभा राहतो. माणसाचे आयुष्य हे सतत विकास पावणारे आहे. जो कार्य करीत राहतो त्याची ताकद वाढतच राहते. हा तर निसर्गाचा नियमच आहे. निसर्गाला आमचा विकास हवा असतो. शरीराची रचनाही अशीच आहे. नव्या व ताज्या विचारांमुळे शरीराला ही सतत ताकद मिळत राहते, निराशवादी विचारामुळे कामामध्ये बाधा येते. म्हणून स्वार्थ-लोभ-मोह ही नाना प्रकारची व्यसने सर्व तारुण्यांचे शत्रू आहेत. कारण या जगात आनंद घेण्यासारख्या खूप गोष्टी आहेत. निसर्गाने आपल्याला जे दिलेले नाही त्याबद्दलच्या विचारात वेळ घालविणे हा मूर्खपणा आहे. बऱ्याच वेळा मी सुंदर नाही किंवा त्याच्यासारखी बुद्धी नाही वा किरण बेदीसारखी तडफ नाही असे कुरकुरत राहतो. स्वत:शी कुढत राहतो. जे आपल्यामध्ये आहे त्याचा आपण कधीच शोध घेत नाही. त्यामुळे जे हातामध्ये आहे तेही दुर्लक्षित राहतं व पुन्हा जमणारच नाही असं मनाशी ठरवून टाकतो..... विसरून जा आपण कोण आहोत ते क्षणभर ! बाजूला ठेवा आपल्या हृदयात,

आपल्या अंतर्मनात डोकावून पहा, फक्त थोडा वेळ द्या..... बघा ना काही दिसते का .....? खरंच प्रत्येकामध्ये असतो असा वेडेपणा. झपाटलेपणा. प्रत्येकाच्या मनामध्ये असतात स्वप्न आणि त्या स्वप्नांच्या दिशेने जाण्याचा ध्यास. पण स्वप्न तर सारीच पाहतात. पण स्वप्नांना सत्यात उतरविण्यासाठी एक विश्वास व श्वास ठेवा. पण स्वप्नांना सत्यात उतरविण्यासाठी जिद्द तर सर्वांकडे असते. पण सर्वजणच का यशस्वी होत नाहीत ...? स्वप्न सत्यामध्ये उतरविण्यापेक्षा स्वप्न पाहण्याचे सामर्थ्य असले पाहिजे. पण लोक त्या स्वप्नांना वेडेपणा समजतात आणि आपणही थांबतो, थोडे मागे राहतो आणि विचार करतो, खरंच आपण वेडे आहोत.... ? चुकतंय का आपले काही ? यालाच आपण अडथळे समजतो आणि स्वप्नांच्या दिशेने जाणारा आपला प्रवासही तिथेच संपवतो. मग काय..... इथेच थांबावयाचे.... इथे तर सर्वांप्रमाणे जगायचे आहे, पण इतरांच्या पेक्षा एक वेगळी ''झेप'' असली पाहिजे ती म्हणजे आपली सर्वजणच म्हणतात की, ''गरुड झेप''.... पण ती झेप काय आहे ? फक्त विश्वास, श्वास व पंखामध्ये उडण्याचे सामर्थ्य पण त्याच्यापेक्षा विचार करण्याची क्षमता आपल्याकडे आहे त्याचे काय .....?

कोणालाच आपल्या स्वप्नांच्या चिंधड्या उडवू देवू नका. त्यांना व्यथित करू नका. आपला मार्ग कधीच सोडू नका. लक्षात ठेवा, आज जरी आपला नसला तरी पुढचा 'क्षण' हा आपलाच आहे. ती वेळ लवकरच येणार आहे आणि काळच सांगणार आहे की आपण कोण आहोत; पण पुढचा क्षण आपला आहे किंवा नाही.... हे तर त्या काळाच्या हातात आहे. पण आपल्याला नुसतं एक पाऊल पुढं टाकण्यास काय हरकत आहे ? काळामधून जो वाचतो तो खूपच मोठा होतो. My Life, My Rules.

**संतोष राजाराम संकपाळ**

बी. ए. ॥



# 'मैत्री'

''मैत्री म्हणजे मनामध्ये
दरवळणारे उत्तर; मैत्री म्हणजे कधी
कोणतेच प्रश्न नसणारे असे एक
अबोल उत्तर.....

'मैत्री' या शब्दातच एक मोठी जादू आहे; मैत्री मग ती लहानपणाचा असो, तरुणपणातील किंवा प्रौढ वयातील. तिला वयाची अट नसते. उलट तिचे अनेक रंग अनेक रूप असतात आणि आहेतही. मैत्री ही फुलासारखी स्वच्छंदी.... सर्वांना निःस्वार्थपणे वास देणारी, निखळ वाहणाऱ्या अशा शुभ्र झऱ्यासारखी; सूर्याप्रमाणे तेज देणारी, रूपेरी चांदण्यात चमकणारी; काट्यातही उठून दिसणारी. न दिसताही आपल्या हृदयात राहणारी..... अशी ही मैत्री. मैत्री म्हणजे रोज भेटणे, भेटवस्तू देणे, बोलणे, एकमेकांना नियमात, बंधनात घालणे; एकमेकांना आश्वासन देणे हे म्हणजे मैत्री !... नव्हे; मैत्री ही फक्त मैत्रीच असते.

''जीवनाच्या चिखलात उमललेलं कमळ म्हणजे मैत्री, निरभ्र आकाशात दिसणारी चांदणी म्हणजे मैत्री, तर खडकाळ डोंगरातील हिरवळीची वाट म्हणजे मैत्री होय.''

मैत्रीमध्ये एकमेकांविषयी आदरभाव, स्नेह, आपुलकी असते. एकमेकांचे स्वभाव जुळलेले असतात. मैत्री एवढ्या-तेवढ्या कारणांमुळे न तोडता समोरच्याला सर्व गुण-दोषांसहित स्वीकारणे. फक्त मैत्रीतच हे शक्य असते. ती कधीच स्वार्थी नसते ही निःस्वार्थ भावनेनं केल्यानेच ती वर्षानुवर्षे टिकत असते.

मैत्री या शब्दातच खूप अर्थ दडलेला आहे. हा भावनेचा सुखद असा स्पर्श आहे. पण जर स्वार्थ असेल तर सर्व व्यर्थ आहे. काळा-गोरा, श्रीमंत-गरीब, जात-धर्म, लहान-मोठा असा भेदभाव खऱ्या मैत्रीत नसतो. मैत्री हा व्यक्तीचा खरा अलंकार आहे. हा अलंकार ज्याला लाभतो तो भाग्यवान.... मैत्री कोणाशीही करू शकतो. त्याची मैत्री ही शुद्ध असते.

सध्याचे युग हे धावपळीचे आहे. कोणालाच रिकामा वेळ नाही. यामुळे एकमेकांकडे जाणे-येणे घडत नाही. प्रत्येकजण आपले करिअर घडविण्यात व्यस्त असून प्रत्येकाच्या वाटा वेगवेगळ्या आहेत. पण एवढ्या सगळ्या गोष्टी सत्य असल्या तरी मैत्रीच्या भावना, त्याच्यातील प्रेम, त्याच्यातील आपुलकी ही कधीच कमी होत नाही. खरं तर जेव्हा दीर्घ काळाने एकमेकांच्या गाठी-भेटी होतात तेंव्हा मनातून आनंदाचे कारंजे फुटून आनंदाश्रू येतात. तेव्हा मनातून जुन्या आठवणींना बहर येऊन त्यात आपण पूर्णपणे हरवून जातो. हे क्षण सारखे यावेत असे वाटते. अशा या आनंदाच्या शिदोरीवर आपण पुढे किती तरी काळ आनंदात राहू शकतो. माणसाजवळ सर्व काही असून जरी त्या श्रीमंतीत त्याच्याकडे खरी मैत्री नसेल तर त्याच्या त्या वैभवाला शून्य किंमत असून तो आणि तोच कमनशिबी म्हणावा लागेल. तर हिच मैत्री एखाद्या गरिबाजवळ स्वच्छ, निःस्वार्थी, प्रामाणिक, निर्मळ आणि विश्वासाची असेल तर त्याला समाजात आणि त्याच्या जीवनात खूप किंमत असते.

''मैत्री नको फुलासारखी,
क्षणभर सुगंध देणारी
नको सूर्यासारखी, सतत तापलेली
नको चंद्रासारखी, दिवसा साथ सोडणारी
नको सावलीसारखी, सतत पाठलाग करणारी
मैत्री हवी अश्रूंसारखी सुख आणि दुःखातही समान साथ देणारी.''

जीवनात सर्व काही मिळवताना खरी मैत्री मिळविणे अतिशय महत्त्वाचे आहे. हा सुखाचा धागा असून तो प्रत्येकाने जपला पाहिजे. आपण आपल्या मित्रांना त्यांच्या मैत्रीला कधीच विसरत नाही हे तितकेच सत्य आहे. ते जुन्या मित्रांत त्यांच्या मैत्रीत घालविलेले क्षण, आनंद आपल्याबरोबर सतत राहतात. ज्यांच्याकडे खरे मित्र नाहीत त्यांना मैत्रीची परिभाषा कळणे कठीणच. पण नसतील तर शांत बसू नका, आपल्या असलेल्या मित्रांच्यात त्याला शोधा. आपल्या जीवनात मैत्रीचा खळखळणारा आनंद आणण्याचा प्रयत्न करा. मैत्री करा, खूप मित्र जमवा; पण ती जीवनभर मैत्री टिकविण्याचा प्रयत्न हा प्रत्येकाने केला पाहिजे म्हणजे मैत्री तुम्हाला सापडेल.

''मैत्री असावी शब्दाशब्दातून जाणणारी, नजरेतून समजणारी, साथीने उमगणारी, जिव्हाळा आणि प्रेमाने फुलणारी, निखळ शुभ्र झऱ्यासारखी वाहणारी, पारिजातकाप्रमाणे बहरलेली, चंदनासारखी गंध देणारी, सुखात सहभागी होऊन दुःखात साथ देणारी, चुका दाखवून गुणांची कौतुक करणारी....''

मृत्यूनंतरही अमर राहणारी, म्हणूनच मी म्हणतो, या सुवासाने दरवळलेल्या मैत्रीमध्ये आहे ना मोठी जादू !

**अस्लम अब्दुल शानेदिवाण**
बी. ए. ॥

## भावपूर्ण श्रद्धांजली

या शैक्षणिक वर्षात देशातील थोर, सामाजिक, शैक्षणिक,
सांस्कृतिक, साहित्यिक, वैज्ञानिक, संशोधक, सैनिक
तसेच राजकीय क्षेत्रातील मान्यवर आणि ज्ञात-अज्ञात व्यक्ती
यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरःशांती लाभो
ही ईश्वरचरणी प्रार्थना !



**प्राचार्य, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी**
**दूधसाखर महाविद्यालय, बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर.**

# चला करिअर करू....

वाटतं, मोठं झाल्यावर कडक इस्त्रीतला पोलीस इन्स्पेक्टर किंवा काळा कोट घालून न्याय देणारा वकील होवू. पण असं वाटणं लहानपणातच. लहानपणी लोक विचारतात, 'तू मोठं झाल्यावर कोण होणार ?' आणि उत्तर दिलं कि, 'मी महात्मा गांधी होणार.' तरी खूप कौतुक करतात. पण मोठं झाल्यावर मात्र लागतात मागे. सतत विचारतात तू काय काम करणार...? किती पैसे मिळविणार....? तो आपला शेजारचा एवढा मिळवतो ? तुला त्याच्या दुप्पट मिळवायचं आहे. एक-ना दोन प्रश्न. उत्तरे देता-देता जीव कासावीस होतो. मग आपणच होतो पूर्णपणे निराश.

पहिला प्रश्न उभा राहतो तो म्हणजे, आधी कोणती साईड घेवू ? कोणत्या अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यायचा आणि तो कुठे घ्यायचा ? कुठलं करिअर भविष्यात चालेल ? अमका-तमका काय करतो ? याच प्रश्नांनी आपण इतके हैराण होतो की, आपण स्वत:च्या टॅलेंटला विसरतो. कारण आपल्याला कोणी रॅन्चोबाबा भेटतच नाही की जो आपल्याला सांगेल की, ''पैसे के पिछे मत भागो, काबिल बनो काबिल, पैसा अपने आप तेरे पिछे आयेगा'' आणि यातून काबिल बनायचं ठरवलंच तर आपल्या आई-वडिलांना सांगणार कोण ? मग चला तर आपणच सावरूया स्वत:ला आणि बघू काय सूचतयं का ? तर ही काही सूत्रे आहेत कदाचित आपला निर्णय सोपा करतील आणि आपल्याला सापडेल आपली हक्काची वाट.

१) आधी एका प्रश्नाचं उत्तर तपासून घ्या कि, मला काय करायला आवडेल ?

२) जग गेलं खड्ड्यात... पैसे किती मिळतील किंवा नाही मिळणार, आई-बाबा काय म्हणतील याचा विचार न करता, तुमचं मन तुम्हाला काय सांगतंय ते पहा.

३) एकदा ठरलं की शोधा ते कसं करायचं...? कुठं करायचं ?

४) आपल्याला जे आवडतं ते करण्याची आपल्यात पात्रता आहे की नाही ते तपासून पहा म्हणजे आपल्याला उगाच वाटतं की, आपण सचिन तेंडुलकर होवू. पण ते शक्य आहे का ? एकदा विचार करा.

५) तो विचार प्रॅक्टिकल असलेला बरा. अनेक लोकांना आवड आणि प्रॅक्टिकल गोष्टी यातील फरकच समजत नाही.

६) नुसतं डॉक्टर व्हायचंय..... पण जीवशास्त्र आवडत नाही, असं आहे का आपलं ?

७) मित्र म्हणतात म्हणून प्रत्येक वेळी निर्णय बदलू नका. स्वत:ला काय वाटतं ते ठरवा. कारण अभ्यासात मदत करायला ते येणार नाहीत. तुम्हाला वाटतं ना वडा-पावची गाडी लावू. बिनधास्त लावा. पण लावल्यानंतर लोक काय म्हणतील ? माझे मित्र काय म्हणतील ? याचा विचार करू नका.

८) आपल्या आई-वडिलांना नाही पटलं तर त्यांना समजावून सांगा. आपण त्यांच्याशी भांडलो, त्रागा केला, तुम्हाला काहीच कळत नाही असं म्हटलं तर ते आपल्याला कसे मदत करतील ? त्यांना समजावून घ्या. आपल्या परिस्थितीकडे उघड्या डोळ्याने पहा.

९) जे काम तुम्हाला आवडेल तेच आपण करायचं. मग त्यात भलेही पैसे नाही मिळाले तरी चालेल. पण मी माझ्या कामात खूष राहणार आहे याची खात्री करून घ्या आणि मगच आपल्या निर्णयावर शिक्कामोर्तब करा.

घेतला ना निर्णय ! मग चला तर झाडून कामाला लागा. 'Best of Luck !'

**स्वप्नील मारुती यादव**

बी. एस्सी. III

# बे एके बे, बे दुणे चूना

कधी नव्हे ते मला आमच्या शेजारच्या एका आजोबांची आठवण आली. या आठवणीबरोबर मला माझ्या लहानपणीची एक गोष्ठ आठवली. तशी ही गोष्ट फार काही मजेशीर आहे असे काही म्हणता येणार नाही. पण तशी ती कंटाळवाणीही नाही. मात्र आम्हा मुलांच्या नावडीचीच ही गोष्ट म्हणावी लागेल. पात्रे जरी ओळखीची असली तरी त्यात काही विशेष नाही. तर ती पात्रे म्हणजे, मी, पाढे, चूना आणि आमचे मास्तरचे 'आजोबा'. जसे आम्ही त्यावेळी खोडकर, विचित्र. तसेच आमचे मास्तरचे 'आजोबा'ही विचित्रच. म्हणजे ते स्वत: मास्तर होते आणि आम्ही त्यांना आजोबा म्हणायचो म्हणून, दोन्ही मिळून आम्ही त्यांचे ''मास्तरचे आजोबा'' असे नामकरण केले होते. तर त्या मास्तरच्या आजोबांना एक व्यसन होते. अरे अरे एक नाही दोन व्यसनं होती. त्यातील एक चांगलं होतं (मास्तरांच्या दृष्टीने) तर एक वाईट होतं. आमच्या मते दोन्हीही वाईटच. असो.... त्यांना म्हणजे मास्तरच्या आजोबांना एक म्हणजे तंबाखूचं व्यसन होतं आणि दुसरं पाढे म्हणवून घ्यायचं. आत्ता तुम्ही म्हणाल... यात काय नवीन ? मास्तर म्हटल्यावर असंच असणार. सगळे मास्तर इथून-तिथून सारखेच मुलांना. (त्यांच्या मनात नसताना अभ्यास करायचा) त्रास देणारे. तर ह्या मास्तरच्या आजोबांची आणखी एक सवय होती आणि आम्हाला त्यांच्या या सवयीची खूप भिती वाटायची. ती म्हणजे तंबाखू खायचा असला तर चूना कधी स्वत:चा वापरणार नाहीत आणि कळस म्हणून सोबत मुलांकडून 'पाढे' म्हणवून घ्यायचे.

तर हे आजोबा आमच्या आजोबांचे मित्र होते. त्यामुळे चुना घ्यायला प्रत्येक दिवसाच्या दुपारी हे महाशय आमच्या घरी यायचे आणि चूना तर घ्यायचेच. तो तर त्यांचा तंबाखूसिद्ध हक्क होता. (मी तंबाखू खाणार पण चूना कधी स्वत:चा वापरणार नाही.) पण चून्याबरोबर आमच्याकडून रोज पूढचा 'बे'चा पाढा किंवा जमलं तर त्यांच्या मनात येईल तो 'बे'चा पाढा आमच्याकडून वदवून घ्यायचा आणि पाढा म्हणायला जमलं नाही तर, 'तू ढम्म भोपळा आहेस.'' तुझा काही उपयोग नाही असं म्हणायचे. पाढा म्हणून दाखविला तर पाठीवर शाब्बासकीची थाप आणि म्हणणार ''पोर हुशार आहे हं.'' जाताना सांगून जाणार पुढच्या वेळी हा ''पाढा'' म्हणून दाखवायचा आणि आम्हाला मूकाट्यानं मनात नसताना तो पाढा पाठ करावा लागे. जर कधी गल्लीत सवंगड्यासोबत खेळत असलो तर, मास्तरचे आजोबा दिसले की, खेळ ताबडतोब बंद करून घर गाठायचो. न जाणो कधी ? केव्हा ? आणि कुठला 'बे' चा पाढा हे ''आजोबा कम मास्तर, तंबाखू कम चूना'' असे हे मास्तरचे आजोबा आम्हाला वदवायला लावतील काय सांगावं ? आत्ता 'बे' चे पाढे आठवणीत असोत वा नसोत; पण हा 'बे'चा पाढा नक्की लक्षात राहिला व तो म्हणजे.....

बे एके बे, बे दुणे चूना आणि आमचे जगावेगळे मास्तरचे आजोबा.

**कु. सविता वसंत पाटील**
बी. ए. III

# पुन्हा एकदा त्याच वाटेवर फक्त तुझ्यासाठी.....

प्रिय सखीस...

माणसाचं मन किती विचित्र असतं त्याला कधी, कुठे, काय आणि कसं आठवेल हे सांगता येत नाही. नियतीनं मला पुन्हा त्याच वाटेवर आणून सोडलंय. जिथं कधी काळी तू जीवाभावाची सखी मला भेटली होती. जिथं कधी काळी आपल्या सोबतीनं असंख्य हास्याचे आणि सुखाचे तारे चमकले होते. आज पुन्हा एकदा मी त्याच वाटेवर आहे. आज या वाटेवरून, या रस्त्यावरून जाताना तो दिवस मला आठवतोय.

त्या दिवशी नेहमीप्रमाणेच मी या वाटेने जात होतो. उरी वेदनांचा पूर, डोळ्यात आसू आणि ओठार ओढून-ताणून आणलेलं हे हासू. अवती-भोवती माणसांनी गजबजलेल्या त्या वाटेवर मी मात्र एकटाच होतो. माझ्याच विचारात, माझ्याच नाहात. आपली म्हणणारी सगळीच जवळ होती, पण माझे हासू आणि आसू यातला फरक कुणाला कळेल असं मात्र कोणी नव्हतं. मी एकटाच, फक्त एकटाच त्या वाटेने जात होतो. रडावेसे वाटत होतं. पण रडता येत नव्हतं. माझ्याच वेदनांत गुरफटलेला मी. बाहेरच्या स्वार्थी आपमतलबी जगाचं मला कसलंच भान नव्हतं. नाही ते मला ठेवायचं होतं. शून्यात नजर लावून प्रेमाचा, जिव्हाळ्याचा ओलावा शोधत होतो मी.

अचानक, अनपेक्षित, नकळत हळूच येऊन तू माझा हात हातात घेतलास. तू हसत होतीस आणि मी मात्र भान हरपून तुझ्याकडं पाहत होतो. असं वाटत होतं, या वाटेवर, या रस्त्यावर इतके दिवस आपण ज्याचा शोध घेत आहोत ते सुद्धा रूपानं समोर आहे. ऊर समाधानानं भरून येत होता..... तू.... तू.... तुझ्या हास्याने माझे आश्रू पुसलेस. तुझ्या डोळ्यातून ओसंडणारं हे प्रेम पाहून मी माझ्या वेदना विसरलो. तुझ्या प्रेमळ आणि गोड शब्दांनी तू माझ्या वेदनेवर फुंकर घातलीस. तुझ्या त्या भक्कम, पण प्रेमळ हाताने तू मला आधार दिलास. कसं.... कसं... सांगू तुला तू काय सुख दिलं होतंस मला. भरभरून प्रेम दिलं होतंस तू मला.

आज....: आज पहिल्यांदाच ती वाट हसत होती. चहूबाजूला बहरलेली ती फुलं, तो निसर्ग ज्यांना मी पहिल्यांदाच पाहात होतो. तेही माझ्याबरोबर हसत होते. किती मजेत होते ते दिवस जेव्हा तू मला रोज भेटायचीस. तुझा तो हवाहवासा वाटणारा सहवास किती सुखद होता. त्याच वाटेवरून चालताना तू मला हसायला शिकवलंस आणि रडायला सुद्धा. या स्वार्थी आपमतलबी जगात स्वत:च्या विचारांवर भक्कम विश्वास ठेवायला तूच शिकवलंस. तूच शिकवलंस मला आनंद उपभोगायला. तूच शिकवलंस मला जगण्यातली मौज शोधायला. तुझ्या सहवासाने सुखाची... हास्याची... आनंदाची असंख्य फुले फुलली होती. माझ्या मनात खरंच तुझ्या नुसत्या सहवासानं माझी सगळी संकटं दूर पळून गेली होती. तू नुसती समोर दिसताच माझ्या वेदना विसरल्या जात होत्या. खरंच किती सुख होतं गं तुझ्या त्या सहवासात..... ?

पण.... पण माझं हे सुख, हा आनंद जणू नियतीला बघवला नसावा म्हणूनच की काय, तिने तुला

माझ्यापासून दूर नेलं आणि मला मात्र पुन्हा त्याच वाटेवर आणून सोडलं... आज... आज मी त्या वाटेवर आहे. इथं माणसं आहेत, फुलं आहेत, पक्षी आहेत, पण तू नाहीस. फक्त तुझी आठवण तेवढीच आहे.

आज पुन्हा तुझ्या नसण्यानं ही वाट उजाड वाटत आहे, भकास वाटत आहे खरंच गं आज माझ्याजवळ तू नाहीस या नुसत्या जाणीवेने मन अस्वस्थ होतंय. या वाटेवरून चालताना घालविलेल्या त्या क्षणाची आठवण होते आणि मग एकटेपणाची जाणीव होते. इथं या माणसांनी गजबजलेल्या वाटेवर मी मात्र तुझ्याशिवाय एकटाच आहे. आज पुन्हा एकदा मला तुझ्या आधाराची, विश्वासाची, प्रेमाची गरज आहे. पुन्हा एकदा तुझ्या त्या भक्कम पण प्रेमळ हाताची मला गरज आहे.

येशील ? पुन्हा त्या वाटेवर, भेटशील ? पुन्हा तिथं, घेशील माझा हात हातात ? घालशील माझ्या वेदनांवर फुंकर ?

'मी तुझी वाट पाहतोय. पुन्हा एकदा त्याच वाटेवर फक्त तुझ्यासाठी मी फुलं घेऊन उभा आहे. तूच दिलेल्या प्रेमाची, हास्याची आणि विश्वासाची. फक्त मी तुझी वाट पाहतोय.''

पुन्हा एकदा या उजाड वाटेवर तुझ्या रूपानं वसंताची बहर येऊ दे. पुन्हा एकदा या वाटेवर तुझ्या रूपानं हिरवळ नांदू दे.

फक्त एकदा ये, माझ्या मनातलं तुझं अढळ स्थान फक्त एकदा पाहून घे.

पुन्हा एकदा त्याच वाटेवर मी तुझ्या येण्याकडे डोळे लावून उभा आहे. पुन्हा त्याच वाटेवर मी उभा आहे. फक्त तुझ्यासाठी....

**रणजीत नारायण खाडे**

बी. ए. III

# "माय"

"वाश्य आरं वाश्या...

जरा ह्यो भारा संभाळ....

य वाश्या....."

चार कोस मैलावरून आणलेला लाकडाचा भारा डोक्यावर घेऊन, माय वाश्याला हाका मारत होती. अंगावर फाटकं, मळकटलेलं लुगडं नेसलेलं. डोक्यावरून घामाच्या धारा वाहत होत्या. त्या काळ्याकुट्ट पडलेल्या आणि श्रमानं थकलेल्या चेहऱ्यावर फक्त घामामुळं ओलावा दिसत होता. गालफाडं बसलेली, डोळे आत खोबनीत बसलेले, असं असून सुद्धा त्या डोळ्यांमध्ये असणारं तेज मात्र अप्रतिम होतं. दिवसभर काबाड-कष्ट करून पोटाची खळगी भरण्यासाठी, त्यातूनच वाश्याच्या शिक्षणासाठी राबणारी अशी वाश्याची माय होती. वाश्याचा बा मरून सहा वर्ष झाली होती, वाश्या लहान असताना टी. बी. सारखा रोग होऊन वाश्याचा बा उपचाराअभावी मेला होता आणि बा गेल्यापासून घराचा सगळा भार मायवर होता.

"ये वाश्या....

मायचा आवाज ऐकून वाश्या धावत बाहेर आला. डोक्यावरचं ओझं उतरायला पुढे झाला.

"आरं.... देवा....

जीव जाया झाला लेकरा.....

वाईच पाणी आण घोटभर...."

मायला पाणी हवं म्हणून वाश्या घरात गेला. वाश्याचं घर पण कसं केंबळ्याचं छप्पर आणि कुडाच्या भिंती. ज्या भिंतींवर मातीचा लेप दिलेला. वाश्या पाणी घेऊन बाहेर आला. माय तिथंच अंगणात एका कोपऱ्यात बसली होती.

"मायं... पाणी...."

गट्ट SSS गट्टSSS गट्टSSS

मायनं ते पाणी गटा-गटा प्यायली आणि म्हणाली,

"आभ्यास केलास नव्हं लेकरा...?" वाश्या म्हणाला,

"व्हय माय !"

मायच्या चेहऱ्यावर कौतुकाचे भाव दिसले... मायचा वाश्याच्या शिक्षणाला फार पाठिंबा होता. त्याने शिकून डॉक्टर व्हावं असं तिला वाटत होतं आणि त्यासाठीच ती अतोनात कष्ट उपसत होती.

वाश्या तसा वयानं लहान; पण त्याला आपल्या परिस्थितीची जाणीव होती. फावल्या वेळी तो मायला मदत करत होता. वाश्याची अभ्यासातील प्रगतीही छान होती. शाळेत सतत त्याचा प्रथम क्रमांक यायचा. वाश्या तसा गुणी मुलगा होता. दिवस पुढे जात होते, वर्ष सरत होती. वाश्या प्रगती करत होता आणि पुढे जात होता. माय कष्ट करत होती. दिवसरात्र वाश्याच्या पुढील शिक्षणासाठी पै-पै जमा करत होती. प्रसंगी उपाशी राहत होती. पण वाश्याला पैसा कमी करत नव्हती.

वाश्या आता दहावी पास झाला होता. नेहमीप्रमाणे त्याचा यावेळी देखील शाळेत नंबर आला होता. चार लोकांच्यात शिकलेला म्हणून तो उठावदार दिसत होता.

वाश्या आता मायला कामात भरपूर मदत करत होता आणि आपल्या शिक्षणाच्या दृष्टीने देखील तत्पर होता. आता तो कॉलेजमध्ये जाणार होता. मायनं आजपर्यंत जमा केलेली सगळी पुंजी तिनं वाश्याच्या हवाली केली आणि वाश्याला तालुक्याच्या ठिकाणी पाठवला.

कॉलेजमध्ये दहा पोरांच्यात उठून दिसावा असा वाश्या अंगानं भरदार होता, रंगानं सावळा असला तरी नाकी डोळी छान होता. वाश्यानं सायन्स शाखेला प्रवेश घेतला. वाश्या जोमाने अभ्यास करत होता. सायन्स अवघड असतं असं ऐकून असल्याने वाश्या आपलं मन फक्त अभ्यासावर केंद्रित करून होता. बाकीच्या मुलांच्यात मिसळणं त्याला आवडत नव्हतं आणि अशा प्रकारच्या त्याच्या स्वभावामुळे त्याला मुलं चिडवत पण असत. वाश्या कोणाकडे लक्ष देत नव्हता. आता बारावीची परीक्षा जवळ आली होती आणि स्वतःच्या तंद्रीत असणारा वाश्या जोमाने अभ्यासाला लागला होता.

बारावीच्या परीक्षेतही त्याने चांगले गुण मिळविले होते. आता तो CET देऊन मेडिकलसाठी प्रयत्न करत होता. इकडे माय अहोरात्र राबत होती. माय खंगत चालली होती. अन्न व्यवस्थित न खाल्ल्यामुळे माय पार सुकली होती. वाश्याच्या देखील कष्टाला फळ मिळत होतं. त्याला सरकारी मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला होता. मायकडं त्या कॉलेजची फी भरण्याएवढा पैसा नव्हता. तरीही तिने आपली उरलेले दागिने विकून, लोकांकडून क़र्ज घेऊन वाश्याला पैसा पुरवला होता.

मेडिकलची साडेचार वर्षे वाश्याने जोमाने पूर्ण केली. आता तो एम. बी. बी. एस. डॉक्टर झाला होता. आज त्याचा गावात सत्कार होता.

गावातील सर्व प्रतिष्ठित तेथे जमले होते. वाश्यानं गावाचं नाव रोशन केलं असं सगळे म्हणत होते. वाश्याची माय आनंदानं वेडी-वेडी झाली होती. तिचे डोळे आनंदानं पाणावले होते. वाश्याचा सत्कार जोरात झाला. आता वाश्या वाश्या न राहता डॉ. वासुदेव झाला होता आणि शहरात दवाखाना काढण्यासाठी जाणार होता.

आठ-दहा दिवस गावात काढून तो शहरी निघाला. मायनं मोठ्या कौतुकानं आणि भरल्या डोळ्यानं त्याला निरोप दिला.

वाश्या आता शहरात आला होता. त्याने मागणी केलेल्या व्यावसायिक कर्जाला मान्यता मिळाली होती. आता तो आपला स्वतःचा दवाखाना सुरू करणार होता. शहरातील लोकांना वाश्याच्या शिक्षणाची किंमत करता येणार होती असं वाश्याला वाटत होतं. वाश्यानं दवाखाना सुरू केला.

इकडे माय गावात एकटी राहत होती. वाश्या आता मोठा झाला होता, त्याचं आता दोनाचे चार हात करून द्यायचे, मग ज्याने चोच दिली तो चाराही देईल, मग हा पोरगा त्याचं तो बघून घेईल असं मायचं धोरण होतं.

इकडे शहरात डॉ. वासुदेव यांचा दवाखाना जोरात चालू होता. तसा पैसाही येत होता. त्याच्या या

व्यवसाय चातुर्यामुळे बड्या व्यक्ती त्याच्या मागे लागल्या होत्या. आमीर बाप आपल्या पोरीसाठी त्याला गळ घालत होते.

म्हणतात ना पैसा मिळाला की मती फिरते. वाश्याचं तसंच झालं होतं. पहिली चार-पाच वर्षे त्यानं मायला पैसे पाठवले. पण आता त्याला वेळ मिळेना झाला. वाश्यानं तिथेच एका आमीर बापाच्या पोरीबरोबर लग्न केलं. तो फ्लॅटमध्ये राहू लागला. जसजसा पैसा मिळेल तसतसा तो गावाकडील मातीचा वास विसरू लागला. माय मात्र त्याची वाट कायम बघायची.

वाश्या कधी तरी गावी जायचा. मायला लुगडं घेऊन जायचा. सोबत चार पैसेही द्यायचा. माय म्हणायची,

''लेकरा, वाश्या माझं या गावात आता राह्यलंय काय ? मला बी तुझ्या संगट घेऊन जा...''

पण फ्लॅट संस्कृती आणि बायकोच्या सहवासाचा परिणाम झालेला वाश्या पार बदलला होता. तो मायला म्हणायचा,

''पुढच्या वेळी जेव्हा मोठा फ्लॅट घेईन तेव्हा तुला नेतो माय....!''

आणि याच आशेपोटी माय त्याच्या वाटेकडे चातकासारखी डोळे लावून बसायची.

वाश्या नवा फ्लॅट कधी घेणार आणि मायला कधी तेथे नेणार हे त्यालाच माहीत. माय मात्र वेड्यासारखी आशा लावून बसली होती आणि वाश्या शहरी संस्कृतीमध्ये पूर्ण विरला. दिवस पुढे सरकत होते. माय वाश्याची वाट बघत राहायची. वाश्या मात्र प्रत्येक वेळी नवीन कारण सांगत होता. वाश्याला लहान मुलगा झाला होता. पण त्याने मायला त्याचं तोंडही दाखवलं नव्हतं. माय मात्र वेड्या आशेवर अजूनही जगत होती... अगदी शेवटपर्यंत....

**अभिजित बाळकृष्ण धुरी**

बी. एस्सी. ॥



# मी 'नकुशी'ची झाले 'शीतल' सर्वांना हवीहवीशी

माणूस म्हणून जन्माला येणं खूप सोप्पं असतं; पण माणूस म्हणून जगणं खूप अवघड. माणूस म्हणून या विशाल जगात जीवन जगण्याचं अनमोल लेणं परमेश्वरानं दिलं आहे. हे जीवन म्हणजे सुखदुःखाच्या आडव्या-उभ्या धाग्यांनी विणलेला रुमाल होय. सुख व दुःखाची वीण घट्ट बसल्याशिवाय जीवन पूर्णत्वापर्यंत जात नाही. दुःख आल्यावर खचून न जाता, माघार न घेता हसत हसत त्याचा स्वीकार केला तरच सुखाचा क्षण समोर येईल. हे दुःख स्वीकारण्याची क्षमता आपल्याकडे असली पाहिजे.

''सुख पाहता जवापाडे दुःख पर्वताएवढे'' या संत तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणे प्रत्येकाच्या जीवनात सुखदुःखाचा संगम हा असतोच. एखाद्याच्या जीवनात कायमस्वरूपी सुख किंवा दुःख आले तर त्याला जीवनाचा अर्थ उमगणार नाही. त्याच्या भावना कधीही व्यक्त होणार नाहीत. माझ्या या आयुष्यात सर्वच काही दुःखे आलीत असे मी म्हणत नाही. इतरांप्रमाणे मलाही जीवनात सुख-दुःखाचे लहान-मोठे प्रसंग स्वीकारावे लागले, त्यांना सामोरे जावे लागले.

पानापानांनी झाड घडते
थेंबाथेंबाने तळे भरते
पाकळ्या पाकळ्यांनी फूल उमलते
आणि क्षणाक्षणांनी आयुष्य घडते.

असेच काहीसे माझेही आयुष्य सुखदुःखांनी बहरत आहे.

ज्या दिवशी १५ मार्च १९९१ ला माझा जन्म झाला त्यावेळी मला, मी या जगात जन्म घेतला म्हणून आनंद तर दूर पण माझ्या आईला ५ व्या वेळीही मुलगीच झाली म्हणून खूप दुःख झाले असेल. माझा जन्म झाल्यावर माझी आई खूप रडली होती हे तिने मला सांगितले. साहजिकच आपल्या या पुरुषप्रधान समाजात मुलगा हाच वंशाचा दिवा, वृद्धापकाळातील माता-पित्यांचा आधार असा समाजाचा अलिखित नियम, दृष्टिकोन आहे. म्हणूनच मुलीला नेहमी 'परक्याचे धन' समजून दुय्यम स्थान दिले जाते. शिवाय हुंडा देण्याच्या कल्पनेने आई-वडिलांना मुलगी म्हणजे विषाचा प्याला, गळ्याला फास असे वाटते. कदाचित माझ्याही आई-वडिलांच्या मनात हाच विचार आला असावा. म्हणूनच पाच नंबरचीही मुलगीच म्हणून त्यांनी निराशेने माझे नाव नकुशी ठेवले. 'नकुशी' म्हणजे नको असलेली असाच काहीसा अर्थ सांगणारी; पण त्यावेळी मला हे काय समजणार ? खरे सांगायचे झाले तर आजच्या या सुशिक्षित समाजात स्त्री भ्रूणहत्या मोठ्या प्रमाणात होत आहेत. मुलगी म्हणून जन्माला येण्याअगोदरच, कळी उमलण्या अगोदरच त्या निष्पाप जीवाला संपवले जाते. जर त्यावेळी माझीही अशीच हत्या झाली असती तर ? माझी ओळख पुसून जावून हे सुंदर जग मला पाहता आलं नसतं.

जेव्हा मुलगा जन्माला येतो त्यावेळी सर्वजण त्याचे खूप लाड करतात. खरं पहायचं झालं तर प्रत्येक आई-वडिलांना आपली मुले नकोशी नसतात. ती हवीहवीशी असतात. पण काही वेळा समाजाचे बंधनही / नियमही असतातच. जीवनाचे पूर्णत्व हे मुलांमध्येच असते. माझ्या वडिलांना माझ्या जन्मानंतर दुःख झाले नाही, मनाने ते खचले नाहीत, मनापासून त्यांनी आमचा स्वीकार केला. आम्ही ६ मुली असतानाही कधीच आमचा त्रागा केला नाही. उलट सर्वांना समानतेने वागवून आमचे पालनपोषण केले. आम्हा सर्वांच्या गरजा व्यवस्थितपणे पार पाडल्या.

पण तरीही माझे नाव 'नकुशी' आहे याचे मला खूप वाईट वाटायचे. शाळेत असताना मला मैत्रिणीही नेहमी विचारायच्या की, तुझे नाव नकुशी कुणी ठेवले आहे ? तुझ्या या नावाचा अर्थ काय ? पण मी काहीही बोलत नसे. शाळेतून घरी आल्यानंतर एकदा मी माझ्या आईला माझ्या नावाबद्दल विचारले. पणी तीही काय

सांगणार ? तिचाही नाईलाज होता. ती याबद्दल कधीही काही बोलली नाही. पण मला हे समजून चुकलं की जास्त मुली झाल्यानंतर शेवटच्या मुलीचे नाव 'नकुशी' (नको असलेली) असे ठेवतात. महाविद्यालयात आल्यानंतर मला माझे हे नाव नको वाटायचे. पण मी स्वत:हून माझे नाव बदलू शकत नव्हते. बी. ए. भाग ३ ला मी मराठी विषय निवडला. मराठीच्या तासाला बसल्यानंतर पाटील सरांच्या अध्यापनाबरोबरच व्यक्तिमत्त्व विकासाच्या शिकवणी, अनुभव यातून जीवन जगण्यासाठी उपयुक्त असे ज्ञान मिळत राहिले.

बी. ए. भाग ३ च्या वर्गात शिकत असताना एक दिवस पाटील सरांनी 'नकुशी' नावाच्या मुलींचे नामांतर करायचे असे तासाच्या वेळी सांगितले. प्रथम मी नामांतरासाठी नकार दिला. पण नंतर मीही यासाठी तयार झाले. आमच्या महाविद्यालयात आम्ही 'नकुशी' नावाच्या तीन मुली होतो. या नामांतर सोहळ्याचा दिवस निश्चित करून सर्वानुमते या कार्यक्रमाची जबाबदारी मराठी विभागाकडे दिली.

३ जानेवारी २०१२ इ।। रोजी महाविद्यालयाने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिवशी लेखिका आशा अपराध, महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. राजगोळकर सर, प्रा. डॉ. संजय पाटील, प्रा. डॉ. अनिल माने, प्रा. डॉ. आनंद वारके, संस्थेच्या संचालिका सौ. कमलाताई चौगले, सौ. सविताताई एकल यांच्या उपस्थितीत नामांतरण सोहळा / बारसे हा कार्यक्रम घेतला. या नामांतर सोहळ्याच्या दिवशी नकुशी हे माझे नाव बदलून मी शीतल असे नाव धारण केले. त्या दिवशी लेखिका आशा अपराध यांनी स्वजीवनातील अनेक प्रसंगातून 'स्त्री-शिक्षणाचे महत्त्व' या विषयावर व्याख्यान दिले.

मला त्या दिवशी खूप आनंद वाटला. कारण हा कार्यक्रम म्हणजे जणू माझ्या जीवनाची नवी सुरुवात व पुढे जाण्यासाठी प्रेरणा, प्रोत्साहन असे मला वाटले. हा अविस्मरणीय सोहळा मी कधीच विसरू शकणार नाही. हा कार्यक्रम म्हणजे माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण असे म्हणावे लागेल. या सोहळ्याचे सर्व श्रेय मी माझे गुरुवर्य ज्यांना ही कल्पना सुचली व ज्यांनी मला पहिल्यांदा शीतल या नावाने उद्‌गारले ते प्रा. डॉ. संजय पाटील सर यांना देते. आज मला खूप अभिमानाने सांगावसं वाटतं की, मला 'नकुशी' नावाची आठवण होत नाही आणि ती होऊ सुद्धा द्यायची नाही..... जीवनातला सगळा आनंद मला त्या दिवशी मिळाला.

शेक्सपियर म्हणाला होता की, 'नावात काय असतं ?' पण नावातच सारं काही असतं हे मला समजले असून मी आता माझ्या नव्या नावाने जगते आहे. हा विचारच माझे जीवन सुखावणारा आहे. शेवटी नावाविषयी बोलायचे झाले तर मी एवढेच सांगेन की, 'नाव हे असं असू नये की ज्याने एखाद्याच्या भावना दुखावल्या जातील. नावामुळे त्यांचे अस्तित्व जिवंतपणीच संपून जीवन केवळ एक निराशा बनेल. जीवनाविषयी सांगताना मला असं सुचवायचं आहे की -

कोणी बोलत नाही म्हणून
निराश कधीच व्हायचं नसतं
निराशेने जीवन कधीच जगायचं नसतं
निराशेमध्येही आशा निर्माण करायची असते
आणि आशेने जगलेले जीवन
किती सुंदर असते हे पाहायचं असतं
तेच खरं जगणं असतं.

बस्स, मला एवढंच सांगावसं वाटतं, 'नकुशी' नाव बदललेल्या शीतलच्या अनुभवाचे हे बोल आहेत.
मी 'नकुशी' ची झाले 'शीतल' सर्वांना हवीहवीशी.

**कु. शीतल तातोबा चौगले**
बी. ए. ।।।

# 'नकुशी' नावाच्या विद्यार्थिनींचा नामांतर सोहळा... एक अविस्मरणीय क्षण

दि. ३ जानेवारी २०१२ रोजी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती. या दिवसाचे औचित्य साधून आमच्या महाविद्यालयातील 'नकुशी' नावाच्या तीन विद्यार्थिनींचा नामांतर सोहळा पार पडला त्यानिमित्ताने......

गेली कित्येक वर्षे आपण भारतीय संस्कृतीचे गोडवे गातो, आपल्या संस्कृतीत अभिमान वाटाव्या अशा कितीतरी चांगल्या गोष्टी आहेत. त्याची परंपरा आपण जोपासलीही पाहिजे. उदा. 'अतिथी देवो भवः' म्हणजे घरात येणाऱ्यापाहुण्यांचे स्वागत करण्याची भारतीयांची परंपरा जगाच्या पाठीवर कौतुकास्पद आहे. परंतु आपल्याकडे स्त्रियांना कमी लेखण्याची, तिचा अपमान करण्याची, तिच्या चारित्र्याचे हनन करण्याची, 'पायीची वहाण पायी बरी' म्हणून तिची मुस्कटदाबी करण्याची, 'चूल आणि मूल' याच कार्यक्षेत्रात तिला जाणीवपूर्वक अडकवून ठेवण्याची, मुलगी परक्याचे धन मानण्याची जी पुरुषी मानसिकता आहे ती बदलण्याची आज गरज आहे. या मानसिकतेतूनच कुटूंबात एका पाठोपाठ अनेक मुली जन्माला आल्या की त्यातील एखाद्या मुलीचे नाव 'नकुशी' ठेवतात. या अंधश्रद्धेमुळे त्या मुलीच्या जगण्यावरच जन्मतः नकाराचा शिक्का मारतात. मुलगाच वंशाचा दिवा, मुलग्यामुळेच वंश वाढतो, पुण्य मिळते, कर्तृत्व फुलते या मागासलेल्या विचारानेच आज स्त्री भ्रूण हत्येची आकडेवारी पाहिली की आपण सुशिक्षित आहोत की रानटी ? असा प्रश्न पडतो.

आपल्याला आई पाहिजे, बहीण पाहिजे, बायको पाहिजे, आत्या, मावशी, आजी पाहिजे मग मुलगी का नको ? याचा आपण गांभिर्यनि विचार करायला हवा. स्त्री-पुरुष समानतेच्या या काळात स्त्री भ्रूण हत्या अशाच होत राहिल्या तर पुढच्या सामाजिक समस्यांना आपल्याला तोंड द्यावे लागेल. आज हजार मुलांच्या संख्येत मुलींची संख्या आठशे पन्नासच्या आसपास आहे. मग राहिलेल्या दिडशे मुलांच्या लग्नाचा प्रश्न उभा राहतो. याला मग आपण कोणता पर्याय निवडणार ? एक म्हणजे अविवाहित राहणे. अविवाहित राहणे समाजाला व व्यक्तिगत आयुष्यातही ते शक्य नाही. किंबहुना त्या व्यक्तीकडे संशयाने पाहिले जाते. अपवाद फक्त कलावंत, शास्त्रज्ञ, समाजसेवक अथवा उच्च ध्येय नजरेसमोर असणाऱ्या व्यक्तींचा. सामान्य पुरुष अविवाहित राहूच शकत नाही. नाही तर तो विकृत मनोरुग्ण होतो. दुसरा पर्याय म्हणजे एका स्त्रीशी अनेक पुरुषांनी विवाह करणे. पण हा पर्यायही व्यक्तिस्वातंत्र्याच्या संकल्पनेत बसत नाही. स्त्री ही व्यक्ती आहे. तिला आपल्या स्वतःच्या भावभावना आहेत. तिची काही एक मते आहेत, जीवनधारणा आहेत. मग हा पर्याय पर्यायच असू शकत नाही. तिसरा पर्याय म्हणजे पुरुषाला देवाला सोडणे. आजच्या यंत्रयुगात, विज्ञानयुगात आपण जगतो आहोत. त्यामुळे हाही पर्याय बरोबर नाही.

म्हणून पुरुषांच्या बरोबरीने स्त्री जन्माला घालणे हे चांगल्या, निकोप समाजाचे लक्षण आहे आणि त्याची गरजही आहे. मग जन्मतःच एखाद्या मुलीवर 'नकोशी' म्हणून शिक्का मारत असाल तर त्या मुलीला आपण जगावे असे वाटेल का ? आणि कुणासाठी तिने जगावे ? तिला स्वतःलाही नकारात्मकतेचा शिक्का पुसावासा वाटणार की नाही ? अनेक मुली जन्माला आल्यावर शेवटच्या मुलीचे 'नकोशी' असे नाव ठेवले की नंतर मुलगा होतो अशीही एक अंधश्रद्धा आहे. असे असेल तर अनेक मुलगे झाले म्हणून एखाद्या तरी मुलग्याचे नाव

'नकोसा' असे ठेवले आहे का ? या प्रश्नाचे उत्तर आपल्याला नकारात्मकच मिळेल. यावरून स्पष्ट होते की, मुली नकोत म्हणून आपण तिचे नाव 'नकुशी' असे ठेवतो.

समाजाच्या या अंधश्रद्धाळू मानसिकतेला बदलण्याचा छोटासा प्रयत्न करण्याचा मनोदय मी, माझे सहकारी मित्र प्रा. डॉ. आनंद वारके, प्रा. डॉ. अनिल माने, प्रा. अशोक माने यांना व्यक्त केला. तो माननीय प्राचार्य डॉ. राजगोळकर सर, संस्था अध्यक्ष आमदार मा. के. पी. पाटीलसाहेब, उपाध्यक्ष मा. ए. वाय. पाटीलसाहेब, संचालिका सौ. कमलताई चौगले, सौ. सविताताई एकल आणि सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सहकारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी, विद्यार्थिनींचे पालक या सर्वांनी उचलून धरला. वार्ताहर मित्रांनी त्याला भरपूर प्रसिद्धी दिली आणि हा नामांतर सोहळा पार पडला.

कोल्हापूरच्या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या आणि लेखिका प्रा. आशा अपराध यांच्या उपस्थितीत ३ जानेवारी २०१२ रोजी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी हा सोहळा झाला. कार्यक्रमादिवशी मा. संचालिकाताईंनी नामांतरावेळी प्रत्येक मुलीला रु. २५०/- चा आहेर दिला. महाविद्यालयाने या तीन विद्यार्थिनींना कपडे घेतले. तर प्रा. डॉ. संजय पाटील, प्रा. डॉ. आनंद वारके, प्रा. डॉ. अनिल माने या प्राध्यापकांनी या विद्यार्थिनींचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारले. प्रा. अशोक माने यांनी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात त्यांची नावे बदलून घेतली. सर्वांच्या शुभेच्छाबरोबर प्रा. डॉ. आनंद वारके यांनी पाळणागीत म्हणून सर्वांना साखरपेढे वाटून हा नामांतराचा आनंद सोहळा पार पडला.

कु. नकुशी भिवा कांबळे, कु. नकुशी चंदर पाटील, कु. नकुशी तातोबा चौगले या विद्यार्थिनींनी स्वतःच्या आवडीने अनुक्रमे सई, वैष्णवी, शीतल अशी नावे धारण केली. या कार्यक्रमामुळे या विद्यार्थिनींना जगण्याची एक नवी दृष्टी, नवी उमेद मिळाली.

यापुढे जाऊन आम्ही या परिसरातील अशा विद्यार्थिनी शोधून त्यांचाही नामांतर सोहळा घेण्याचे निश्चित केले आहे. ही एक सामाजिक चळवळ आहे. स्त्रीभ्रूण हत्या तर थांबल्याच पाहिजेत. शिवाय समाजात काही अशा नकारात्मक, अंधश्रद्धाळू घटना घडत असतील तर त्याही थोपविण्याची जबाबदारी शिक्षक म्हणून आपलीच आहे. या सामाजिक चळवळीत काम करणाऱ्या अहमदनगरच्या सामाजिक कार्यकर्त्या डॉ. सुधा कांकरिया यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन ही चळवळ पुढे नेऊ या. यामध्ये कोल्हापूरचे जिल्हाधिकारी मा. लक्ष्मीकांत देशमुखसाहेब यांचीही कामगिरी मोलाची आहे. त्यांचा 'सेव्ह द बेबी गर्ल' हा उपक्रमही स्तुत्यच आहे. त्यांचीही यानिमित्ताने दखल घेणे मला गरजेचे वाटते.

हा नामांतराचा सोहळा माझ्या जीवनातील अविस्मरणीय क्षण आहे.

या सामाजिक चळवळीत सर्वांचा सहभाग महत्त्वाचा. आम्ही तिघे केवळ निमित्तमात्र.

धन्यवाद.

**प्रा. डॉ. संजय दशरथ पाटील**

# पद्य विभाग

## स्वागत

मृगजळाच्या रेतीतून
रेतीच्या त्या कणा कणातून
कणा-कणाच्या त्या अणू-रेणतून
अणुरेणूच्या केंद्रबिंदूतून
केंद्रबिंदूच्या आकर्षणातून
आकर्षणाच्या भोवऱ्यातून
भोवऱ्याच्या वलयातून
वलयाच्या स्पंदनातून
प्रत्येक स्पंदनाच्या हृदयातून
हृदयाच्या प्रत्येक स्पंदनातून
सहर्ष स्वागत....
सहर्ष स्वागत....

**नितीन साताप्पा फराकटे**
बी. ए. III

## भारत गौरव

हा असो वा तो असो
नाही होत देशात प्रोग्रेस
महाराष्ट्र असो वा बिहार
साचतात भ्रष्टाचाऱ्यांचे प्रहार
तो चारा खाऊन लठ्ठ
गुन्हेगार रचतो नवे नवे कट
सोडवितो त्याला ॲडव्होकेट
देशाचा असतो रक्षक
तोच होतो भक्षक
राजकारणात होत नाही कायापालट
तोपर्यंत आमची ससेहोलपट
कसली ही त्यांची जगावेगळी युती ?
थांबली आमची सगळी प्रगती
राज्यकर्त्यांना झाली विकृती
बदलूया आपलीच मनोवृत्ती !

**दिगंबर कृष्णात भावके**
बी. ए. III

## नशीब आम्ही इथे जन्मलो

अमृताहून गोड
अशी ज्याची ख्याती आहे
रक्ता-रक्तात मराठ्यांच्यात
भरलेली जिची व्याप्ती आहे
नशीबवान आम्ही इथे जन्मलो
मातृभाषा आमची मराठी आहे
तन मराठी, मन मराठी
श्वास मराठी, ध्यास मराठी
मराठी जगण्याची शक्ती आहे
नशीबवान आम्ही इथे जन्मलो
मातृभाषा आमची मराठी आहे
घडविले जिने, वाढविले जिने
सन्मानाने जगायला शिकवले
आठवणीनेही जिच्या जिने
उधान्नापासून मुक्ती आहे
नशीबवान आम्ही इथे जन्मलो
मातृभाषा आमची मराठी आहे.
।। जय भवानी ।।
।। जय शिवाजी ।।

**सचिन राजाराम फराकटे**
बी. ए. ।।।



## ''मी मायबोली'' (मराठी)

परंपरा परी जुनी असुनी,
अस्तित्व खुणा शिलालेखी
ज्ञानदीप उजळले ज्ञानदेवाने
परी मी ''अमृताशीही पैजा जिंकी'' ।।१।।
ओवी-अभंगाची लयलूट होऊनी
आत्मतेजाने मी देव्हारा उजळून टाकी
टाळ-मृदंगाचा गजर, वारकरी
भावभक्तीची सांगड राखी ।।२।।
संस्कृत माझी गीर्वाण वाणी
संस्कृतीचा अनमोल ठेवा
शब्दसाठा पुरवूनी तिने
उजळला माझा अंधारातील दिवा ।।३।।
पंडीतकवींची आख्याने काव्ये
संतकवींची अभंगवाणी, गवळण
शूर-शाहिरांचे पोवाडे अन्
लावणी, शृंगार-रसाची उधळण ।।४।।
शिवरायांनी - शिवराज्य करूनी
शिवशाहीचा झेंडा फडकविला
नम्र होऊनी वंदन करुनी
ज्याने माझा 'इतिहास' घडविला ।।५।।

**उमेश हणमंत कुंभार**
बी. एस्सी. ।।।

## लेकरासाठी....

आला होता सूर्य मध्यावर
अजूनही माय होती शेतावर
सोसत होती उन्हाच्या झळा
थांबवीत होती पोटाच्या कळा

अन् मनाशीच म्हणत होती
नको खुरपे माझ्या पोराच्या हाती
म्हणूनच करून निर्धार ठाम
करत होती कामच-काम

कारण बाई म्हणत होत्या काल-दुपारी
तुमचा पोरगा हुशार लय भारी
म्हणून त्याला शिकवायचं हाय
या रखरखत्या उन्हात खपायचं हाय

शिकवायचं आहे माझ्या लेकराला
साहेब झालेलं पाहायचं मला
म्हणून ती राब-राब राबत होती
लेकराच्या आशेवर काम करत होती

उद्याच्या आशा-आकांक्षा उन्हात खपवत होती
लेकरासाठी फक्त अन् फक्त लेकरासाठी....

**कु. पूनम श्रावण चोपडे**
बी. एस्सी. ।

## आई

आईसाठी काय लिहू
आईसाठी कसे लिहू
आईसाठी पुरतील एवढे
शब्द नाहीत कोठे
आईवरती लिहिण्याइतपत
नाही माझे व्यक्तिमत्त्व मोठे
जीवन हे शेत तर आई म्हणजे विहीर
जीवन ही नौका तर आई म्हणजे तीर
जीवन ही शाळा तर आई म्हणजे पाटी
जीवन हे कामच काम तर आई म्हणजे सुट्टी
आई तू उन्हामधली सावली
आई तू पावसातील छत्री
आई तू थंडीतली शाल
आता यावीत दुःखे खुशाल
आई म्हणजे मंदिराचा उंच कळस
आई म्हणजे अंगणातील पवित्र तुळस
आई म्हणजे भजनात गुणगुणावी अशी संतवाणी
आई म्हणजे वाळवंटात प्यावं असं थंडगार पाणी
आई म्हणजे आरतीत वाजवावी
अशी लयबद्ध टाळी
आई म्हणजे वेदनेनंतरची
सर्वात पहिली आरोळी....

**मारुती नामदेव परीट**
बी. ए. ॥

# तू मला प्रिय आहेस आई...

आई तुझ्या संस्कारातून
कोवळ्या रोपाचे तरू झाले,
मी कसा विसरेन गं तुला,
तुझ्यामुळेच मी महान झाले.
तुझा तो मायेचा पदर,
लपवित होता सारे प्रमाद,
तुझ्याविना माझा क्षण,
नव्हता गं जात....
कधी तू मारतेस मला,
तुझ्या प्रेमळ करांनी,
पण दोष देशी स्वत:ला,
काही क्षणांनी....
मी दूर जाता तुझ्यापासून,
चिंता लागे तुझ्या जिवा,
जरी मी मोठी झाले,
तरी तुझ्या मायेचा पदर हवा...

**कु. पूनम दिगंबर कुरडे**
बी. एस्सी. ॥

# आई

धगधगत्या उन्हातही सू सावलीसारखी
रिमझिमत्या पावसातही तू वाऱ्यासारखी,
कडकडणाऱ्या थंडीतही तू उन्हासारखी
सुकलेल्या फांदीवर तू नव्या वेलीसारखी,
चैतन्याने भरलेल्या जीवनासारखी
तू माझी आई !.

**कु. ऋतुजा बाबूराव कोपार्डेकर**
बी. ए. ॥

# माझी ताई

ताई म्हणजे शितल सावली
ताई म्हणजे जणू दुसरी माऊली.
ताई म्हणजे चिंचा आंबट गोड
ताई म्हणजे मूर्तीमंत ओढ.
ताई म्हणजे जीवाभावाची सखी
ताई म्हणजे क्षमाशील धरती.
ताई म्हणजे संस्काराचा धरा
ताई म्हणजे जणू मायेचा झरा.
ताई म्हणजे सुखाचा वारसा
ताई म्हणजे मनाचा आरसा.... .

**कु. वर्षाराणी सर्जेराव काशिद**
बी. ए. ॥

# वेळ नाही

अमाप सुख आहे सगळ्यांच्याच पदरात,
पण ते अनुभवायला आज वेळ नाही.
आईच्या अंगाईची जाणीव आहे पण,
आज त्याच आईला 'आई' म्हणायला वेळ नाही.
सगळी नाती जोडून झाली पण,
त्या नात्यांना जपायला आज वेळ नाही.
सगळ्यांची नावं मोबाईलमध्ये सेव्ह आहेत,
पण त्यांच्याशी बोलायला आज वेळ नाही.
सर्वजण रिमिक्स, डीजे गाणी ऐकण्यात गुंग आहेत,
पण लहानपणी आईने म्हटलेल्या अंगाईतल्या चार
ओळी आठवण्यास आज आपल्याकडे वेळ नाही.
जीवनाचे सुख हे मोबाईलमध्ये नसून घडवणाऱ्या
कर्तृत्वावर आहे, पण हे जाणून घेण्यास
आजच्या जनतेकडे वेळ नाही.

**कु. जयश्री संभाजी पाटील**
बी. एस्सी. ।

## अरे कसलं लेकाहो माणूस तुम्ही ?

अरे कसलं लेकाहो माणूस तुम्ही
अजून सुद्दिक पेटत नायं
६० वर्षे बसून सुद्दिक
चुलीत जाळ उठत नाय ।।धृ ।।

शाळेमधल्या पहिल्या इयत्तेत पॉर जवा पाऊल टाकतं
जात-पात मनात घेऊन पाण्याविना कुडत बसतं
अरे बाबासाहेबांच्या पापणीतलं पाणी अजून सुद्दिक
गोठत नाय
अरे कसलं लेकाहो माणूस तुम्ही
अजून सुद्दिक पेटत नाय ।।धृ ।।

पहिलीपासून शेवटपर्यंत समानतेचे पाठ लावल्यात
श्रीमंतांच्या पायाबुडी गरिबाचं पॉट देत्यात
झोपडीत इथल्या कंदिलाचा उजेड
अजून सुद्दिक पडत नाय
अरे कसलं लेकाहो माणूस तुम्ही
अजून सुद्दिक पेटत नाय ।।धृ ।।

गल्लीपासून दिल्लीपर्यंत भ्रष्टाचाराचा फास पडलाय
पंतापासून, पंथापर्यंत खुर्चीचाच ध्यास लागलाय
साला देव सुधि खुर्चीपुढं झुकत हाय.
अरे कसलं लेकाहो माणूस तुम्ही
अजून सुद्दिक पेटत नाय
६० वर्ष बसून सुद्दिक
चुलीत जाळ उठत नाय ।।धृ ।।

**शहाजी चंद्रकांत गोंगाणे**
बी. ए. ।।।

## जीवन एवढं आहे का स्वस्त ?

का करता जीवनाचा अस्त ?
जीवन एवढं आहे का स्वस्त ?
आयुष्य फक्त एकदाच मिळतं
ते कधीही गमवायचं नसतं.
संकटांना घाबरून जायचं नसतं
त्यांना सतत तुडवायचं असतं.
जीवनात काहीतरी बनायचं असतं
आपलं अस्तित्व टिकावायचं असतं
जायचं तर सगळ्यांनाच असतं
त्याआधी चमकून दाखवायचं असतं.
जीवन जगणं फुकटचं नसतं
त्यासाठी सतत झगडावं लागतं.
जीवन जीवन काय असतं ?
मानलं तर सगळंच मस्त
नाही तर होतो सगळ्याचाच अस्त
नाही तर होतो सगळ्याचाच अस्त ।.

**कु. दिपाली जयसिंग पाटील**
बी. एस्सी. ।



## जीवन

जीवन काय असतं ?
रीत असते जगण्याची,
पद्धत असते राहण्याची,
देव-घेव असते विचारांची.
जीवन काय असतं ?
भांडार असतं शब्दांचं,
जीवन असते सज्जनांचं,
तसंच असतं दुर्जनांचं.
जीवन काय असतं ?
भरती असते दुःखाची
ओहोटी असते सुखाची,
मस्ती असते जगण्याची.
जीवन काय असतं ?
आशीर्वाद असतो मोठ्यांचा,
प्रोत्साहन असतं शिक्षकांचं
मदत असते मित्रांची
दुसरं-तिसरं काय नसतं,
हेच आपलं जीवन असतं.

**कु. पूनम रघुनाथ मांगले**
बी. ए. ।

## वेड लागलं माणसाला !

काय सांगू तुम्हाला वेड लागलं माणसाला,
पूजा करतो दगड-धोंड्यांची
सेवा करतो आई-बाप सोडून
फसव्या ढोंगी बुवांची.
काय सांगू तुम्हाला, वेड लागलं माणसाला,
रोग्याला घेऊन जातो साधूकडे
बघत नाही डॉक्टरांकडे,
दुःख पसरते चोहिकडे
काय सांगू तुम्हाला, वेड लागलं माणसाला
नवस बोलतो देवाला, देव मानतो दगडाला
बळी देतो बोकडाला,
जेवू घालतो पै-पाहुण्याला
काय सांगू तुम्हाला, वेड लागलं माणसाला.

**शाहू बाबुराव कांबळे**
बी. ए. ॥

## जीवनाची लढाई...

फुलाने अपेक्षा केली का कधी
काट्याकडून आधाराची ?
जमिनीने कधी वाट पाहिली का
आभाळाच्या सावलीची ?
किनाऱ्याला वाटली भिती
समुद्राच्या पाण्याची ?
कधी वाऱ्याने संगत धरली का
शेवटपर्यंत पाचोळ्याची ?
अशीच लढाई आहे आपल्या जीवनाची
फक्त ती आपल्यालाच आहे जिंकायची !

**प्रविण रामचंद्र एकशिंगे**
बी. ए. ॥।

# पावलं पुढं पडली तर...

सगळं काही शक्य होतं मनात जिद्द असली तर
उन्हाचही चांदणं होतं पावलं पुढं पडली तर.... .
खेड्यातलं एक पाखरू बघता बघता उडालं
आकाशात झेप घेत जग पाहून हरखलं.
शेताइतकीच आवडायची मनापासून त्याला शाळा
गुरुजींचा शब्द शब्द मनात त्याने रुजवून घेतला.
वर्गाआधीच वाचायचा पुस्तकातले सगळे धडे
पटापट उत्तरे द्यायचा सगळ्यांना पडे कोडे.
बापाला म्हणाला एकदा, ''मला नवं सापडलंय शेत,
तिथंच मी राबत जाऊन सोन्यासारखं पीक घेत.''
शिकत-शिकत,वाचत-वाचत घेतली पीएच्. डी. पदवी
गावाकडच्या कॉलेजात विद्यार्थ्यांना प्रकाश दाखवी.
तरी त्यानं शेतावरची फेरी कधी नाही चुकवली
संध्याकाळी बांधावर बसून रोज एक कविता लिहिली.
रानामधल्या मातीचा वास त्याच्या कवितेला
आई-बापाच्या घामाची ओल हळव्या शब्दाला.
कवितेला झुळझुळत्या वाऱ्याचा स्पर्श होता
गोठ्यामधल्या गाईच्या हंबरण्याचा नाद होता.
एक पुस्तक प्रसिद्ध झालं साऱ्यांच्या कौतुकाचं
पुरस्कारांचा पडला पाऊस... फूल झालं काट्याचं.
गावालाही अप्रूप केवढं सुरवंटाचं पाखरू झालं
घरट्यामधल्या पाखरानं झेप घेत आकाश गाठलं !
सगळं काही शक्य होतं मनात जिद्द असली तर
उन्हाचंही चांदणं होतं पावलं पुढं पडली तर.... .

**ऋषिकेश विष्णू पाटील**
बी. ए. ।

# स्वप्ने

वाऱ्यासरशी उडावा अत्तर
तशी स्वप्ने उडावीत
असं वाटतं सर्व सोडून
फुलपाखरासारखं उडावं मनमीत.
वाऱ्याच्या ओघानं वहावं
किलबिल किलबिल गात गीत
नकळत का होईना
ओठी फुलावं छानसं स्मित.
ना नसावी सोबत अन् नसावा सोबती
ना अडकावं या जाळ्यात
कधी तळ्यात तर कधी मळ्यात
मनात मात्र नसताना सर्व पडतं गळ्यात.
जीवनामध्ये ही कोंदली साळी
नशीब म्हणू की लेखली भाळी
रंगवलेली स्वप्न कधी काळी
पुसूनही जाते स्मृती मात्र त्यांच्या
नेहमीच राहतात मनात.

**कु. अश्विनी आनंदा मगदूम**
बी. ए. ।।।



# 'नशीब'

नशिबात जे असतं ते घडतं
म्हणून नशिबाला दोष द्यायचा नसतो
नशिबात जे घडलं नाही म्हणून
निराश व्हायचं नसतं
येणाऱ्या संकटाला सामोरं जायचं असतं.
मनात दु:ख ठेवून हसायचं असतं
यालाच तर जीवन म्हणायचं असतं.
आपण नशिबाच्या हातात नाही तर
नशिबाला आपल्या हातात घ्यायचं असतं,
यालाच तर जगणं म्हणायचं असतं.
नशिबात एकदा हरलो म्हणून
जीवन संपवायचं नसतं
नशिबाला पुन्हा घडवायचं असतं
त्यातच स्वप्नांना आकार द्यायचा असतो
यालाच तर नशीब म्हणायचं असतं
यालाच तर नशीब म्हणायचं असतं..... .

**श्रीकांत शंकर बचाटे**
बी. एस्सी. III

# शब्द

शब्द हृदय जोडून जातात
शब्द हृदय तोडून जातात
शब्द कधी काहीही न करता
मोठा खेळ खेळून जातात.
शब्द कधी विषारी होतात
आणि नाते तोडून टाकतात
शब्द मर्यादा न बाळगता
कधी काहीही बोलून जातात.
शब्द कधी मनात
काट्यांचे घर बनवतात
शब्द शब्द लिहिता लिहिता
आयुष्याची पाने उलटून जातात.
शब्दाबद्दल किती लिहावं ?
शब्दच अपुरे पडून जातात.

**कु. अपर्णा कृष्णात गुरव**
बी. ए. II



## मैत्री

मैत्री म्हणजे काय असते ?
रक्ताचं नसून त्यापेक्षा एक मोठं नातं असतं,
मैत्री असते मैत्रीसारखी
संकटकाळी मदत करणारी,
सुखदुःखात साथ देणारी,
मैत्री असते मैत्रीसारखी.
चांगल्या गोष्टीची स्तुती करणारी,
चुकांची जाणीव करून देणारी
हाकेला साद घालणारी.
मैत्री म्हणजे.....
दोन वेगळ्या विचारांची जुळवणी
मनाने मनाला दिलेली प्रेमाची
आठवण असते
न तुटणारी रेशमाची गाठ असते
मैत्री असते मैत्रीसारखी.
सूर्यापेक्षा प्रकाशमान असते
मैत्री म्हणजे मायेने जवळ घेणारी
जखमांना फुंकर घालणारी
वेळोवेळी दिलासा देणारी
मैत्री ही नि:स्वार्थी नात्याची
मूर्ती असते !! .

**कु. सुप्रिया शिवाजी टोपले**
बी. ए. ॥

## मैत्री

मैत्री म्हणजे मायेची आठवण
मनाने मनाला दिलेली आठवण.
मैत्रीचा धागा नीट जपायचा असतो
तो कधी विसरायचा नसतो.
एकमेकांच्या यशासाठी आपलं
सर्वस्व अर्पण करायचं असतं.
मैत्री म्हणजे न मागता
समोरच्याला दिलेले भरभरून प्रेम असतं.
आयुष्यात चांगले मित्र नकळत
मिळत असतात
तोडणं हा क्षणाचा खेळ असतो
पण, जोडणं हा संपूर्ण आयुष्याचा मेळ असतो.

**कु. अनुराधा अशोक पाटील**
बी. ए. ॥

## 'मैत्री'

मैत्रीचं एक वेगळंच नातं
हृदयाच्या कप्प्यात जपावं लागतं.
मैत्रीचं एक नाजूक बंधन
मैत्री म्हणजे काचेचं कंकण.
मैत्रीचा एक वेगळाच बाज
मैत्रीला शोभतो विश्वासाचा साज.
मैत्री म्हणजे नाही नुसतं प्रेम
मैत्री जपणं म्हणजे अवघड गेम.

**सुशांत शिवाजी गुरव**
बी. ए. ।

## मैत्री

शिंपल्यात डोळे घालून
समुद्र कधी पाहता येत नाही.
निळ्याभोर गगनाचा
अंत कधी लागत नाही.
खऱ्या मैत्रीच्या
भावनांचा उल्लेख
शब्दात कधी होत नाही.

**कु. दिपाली शंकर पाटील**
बी. ए. ॥

## मैत्री

लांबचा पल्ला गाठताना
दूर दूर जाताना.... .
दु:ख सारी खोडायला
नवे नाते जोडायला.... .
ठेच लागता सावरायला
चुकीच्या वाटेवर आवरायला.... .
मी असेल तुझ्याबरोबर नेहमीच
तुझ्या प्रश्नांची कोडी सोडवायला.... .

**कु. तेजस्विनी शांताराम पाटील**
बी. ए. ॥

## मैत्री आणि प्रेम

मैत्री म्हणजे विश्वास
मैत्री म्हणजे प्रेम
मी म्हणजे तुझा विश्वास
तू म्हणजे माझं प्रेम.... .

मैत्रीमध्ये असतं सुख
प्रेमामध्ये असतो आनंद
मैत्रीतील सुखात प्रेम असावं
प्रेमातील आनंदात मैत्री दिसावी.... .

मैत्रीनेच प्रेम जुळते
प्रेमानेच मैत्री होते
मैत्री प्रेमाने राहते
प्रेम मैत्रीने टिकते...... .

मैत्री ही एक प्रेमाचा भाग
प्रेम ही एक मैत्रीची हाक
मैत्री प्रेमाचा भाग रहावी
प्रेम मैत्रीची हाक असावी.

**महेश धोंडिराम पाटील**
बी. ए. ॥



## फुलराणी

ती माझ्या स्वप्नातील फुलराणी
खुलत असे गुलाबाच्या फुलावाणी ।।धृ।।
रोज म्हणत असे ती मनोमनी
तू हृदय व मी प्रेमकहाणी ।।१।।
मी आकाश तर ती मानिनी
आठवतो तिला प्रत्येक क्षणोक्षणी ।।२।।
तिचं हसणं जणू खळखळतं पाणी
म्हणे, तू आशिक मैं तेरी दिवानी ।।३।।
रूप तिचं, जशी रात्रीची रातराणी
मी Zoology, ती माझी Botony ।।४।।
कशी सांगू माझी प्रेमकहाणी
मी बाजीराव तू माझी मस्तानी ।।५।।

**रोहित रविंद्र पाटील**
बी. एस्सी. III



## व्यथा एका देठाची

कळ्यांनी उमलायचं,
फुलांनी फुलायचं,
देठांनी मात्र तुटतंच रहायचं
फुलांचं ओझं डोक्यावर घेऊन नाचायचं
दुसऱ्यासाठी मध्येच तुटून जायचं.
रात्रीच्या काळोखात बंडाचा विचार...
घेऊच द्यायच्या नाहीत कळ्या डोक्यावर
फुलांना फुलू द्यायचं नाही माथ्यावर
मग माझ्याकडे कुणीच नाही होणार आकर्षित
पण प्रभातीच्या शुद्ध प्रकाशात नवा शुद्ध विचार
या वांझपनाच्या सुखापेक्षा,
त्या तुटण्यातच आहे मोठं समाधान..... .

**आनंदा अशोक सासमिले**
बी. ए. III

## तुझी आठवण

येईन किंवा न येईन
परत तुझ्या भेटीला
आठवणी मात्र बांधून ठेवीन
काळजाच्या गाठीला.
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर
आठवण तुझी येत राहील....
अलगद असा,
पापण्यांवरून अश्रू
एखादा ओघळून जाईल.
तोच अश्रू तुझी आठवण
आल्याचं नकळत सांगून जाईल..... .

**विशाल बाजीराव चौगले**
बी. ए. I

## आर्त साद

जीव गुदमरून जातोय गं,
मनाशी माझ्या खेळू नको अशी,
मी तुझ्यावर प्रेम करतोय,
मारू नको थाप अशी.
स्वप्नांना माझ्या चुरगळतेस का ?
हृदयाला माझ्या छळून अशी
प्रत्येकवेदनेत माझ्या तूच असतेस
मग जखमेवर मीठ चोळतेस का अशी ? .
बीन तेलाचा स्वत: जळतोय,
तू प्रकाशात राहण्यासाठी,
माझ्या भावनाना पायाखाली तुडवतेस,
तुझ्या स्वार्थी भावनेपोटी.
सुंदर-सुखी आयुष्य मिळते,
ज्याच्या-त्याच्या कर्मावरती,
तुझा अहंकार घाव करून जातो,
जुन्या जखमेच्या वर्मावरती.
तुझ्यावर विश्वास ठेवला कारण,
प्रेमाची ही रीत असते,
पण तू विश्वासघातकी आहेस,
असं तर मला वाटलंच नव्हतं.
हसावं तर लोक वेडा समजतील,
रडावं तर लोक हळवा समजतील,
असं कोणीच नाही का हो ?
जे मला समजून घेतील ?
क्षणा-क्षणाला जगायचं असल्यास,
क्षणा-क्षणाला मरावंच लागतं,
सहवासात हसायचं आणि विरहात रडायचं असल्यास,
कुणावर तरी प्रेम करावंच लागतं.
दैवानं ही खेळी खेळली नसती,
नशिबानं मग साथच सोडली नसती,
मी तुझ्या दारात येऊन,
प्रेमाची भीक मागितलीच नसती.
प्रेमाविना मी भिकारी आहे,
तिच्याकडे भीक काय मागणार,
हृदय जिचे दगड आहे,
हृदयाला पाझर काय फुटणार ?
खोट्या प्रेमाचा देखावा करून,
फसवलंस माझ्या वेड्या मनाला,
खऱ्या प्रेमाच्या वेदना सोसून बघ,
मीच आठवेन क्षणा-क्षणाला.
स्फुंदणाऱ्या मनाला सांगेन,
आता नाही रडायचे,
डोळा चुकविणाऱ्या हृदयाला सांगेन,
आता नाही बिघडायचं.

**कु. ऋतुजा सिताराम पाटील**
बी. एस्सी. II

## 'नातं तुझं नि माझं'

तुझं नि माझं नातं कोणते ?
मी तर अजून जाणलं नाही
जवळ तुझ्या नसले तरी
दूर मात्र झाले नाही.
हे मात्र सत्य होतं
मी तुझ्यातच कुठंतरी हरवत होते
हसण्यातच तुझ्या हसणं माझं लपवत होते
दु:ख सारं तुझं माझ्यासाठी मागत होते.
आपल्या या नात्याला कुणी म्हटलं मैत्री
तर कुणी म्हटलं प्रेम
मी त्यांना काहीच बोलले नाही
कारण तुझं नि माझं नातं कोणतं ?
मी तर अजून जाणलं नाही.
आता मात्र नातं आपलं
मी हळूहळू जाणत आहे
प्रेमाला थोडं कमी असलं तरी
मैत्रीहून ते जवळचं आहे.

**कु. वैशाली विश्वास खोत**
बी. ए. III

## प्रेम म्हणजे...

प्रेम म्हणजे काय हे कधी कुणाला कळेच नाही
छोटेसे कोडे ते, पण कुणाला उलगडलंच नाही... .

का जीव होतो वेडा-पिसा जेव्हा येते तिची आठवण
हृदयात केलेली असते तिच्या छोट्या छोट्या
गोष्टींची साठवण.... .

मनाला तिच्याशिवाय दुसरे काही सुचत नाही
पण तिच्याशिवाय दुसरा कुठला विचार करावा असे
कधी वाटत नाही.... .

रात्री छानच असतात.... तिच्या स्वप्नांनी भरलेल्या
देऊन जातात उभारी...
मनातल्या त्या प्रेमाच्या अंकुराला.

प्रेम कधी सफल होते तर कधी नाही....
ते जीवनात कधी सबकुछ नसतं,
पण तरीही हृदयाच्या कुठल्यातरी कोपऱ्यात नेहमी
जपायचं असतं.... .

प्रेमाचे हे कोडे कदाचित
कधीच कुणाला उलगडणार नाही
पण त्यासाठी हे जग प्रेम करायचेही
कधी थांबणार नाही.....! .

**रविंद्र दशरथ चौगले**
बी.सी.एस. III

## मी प्रेम केलं

प्रेम करताना कसला विचार करायचा नसतो,
विचार करून कधी प्रेम करता येत नाही
मी प्रेम केलं.... .
तुझ्या गोड हसण्यावर, तुझ्या शांत बसण्यावर,
तुझ्या मन मोकळेपणावर
वेगळ्या वाहणाऱ्या स्वभावावर...
मी प्रेम केलं... .
तुझ्या मंजुळ हसण्यावर,
मासुळी डोळ्यातील बोलकेपणावर,
तुझ्या चेहऱ्यावरील निरागसतेवर
आणि तेवढ्या शांत मनावर
मी प्रेम केलं.... .
तुझ्या कधीतरी रागावण्यावर,
रागाने लाल झालेल्या नाकावर,
लटके नाक मुरडण्यावर आणि
गाल फुगवून बसण्यावर
मी प्रेम केलं.... .
तुझ्या इश्य....!
म्हणण्यावर तारुण्य सुलभ लाजण्यावर,
लाजून झुकणाऱ्या नजरेवर आणि
गुलाबी झालेल्या गालावर.
प्रेम फक्त करायचं असतं निःस्वार्थ मनाने,
मी फक्त प्रेम केलं मनापासून मनावर.

**प्रविण मधुकर पाटील**
बी. ए. III

## सुटणारच असते साथ कधीतरी

सुटणारच असते साथ कधीतरी
तुझी-माझी, तिची-त्याची
एकमेकांना असणारी....
कुठलीच सोबत नसते चिर:काल टिकणारी
आज ना उद्या घ्यावाच लागतो
निरोप एकमेकांना एकमेकांचा.
पण तरीही
आठवणी जाग्या राहाव्यात
जाग्या राहाव्यात नात्यातल्या सुंदर जागा नि
पाहिलेली स्वप्न एकमेकांच्या साथीनं
जी विझवू पाहताही विझली नव्हती कधीच
निसटता निसटता फक्त
निसटते राहतात स्पर्श
एकमेकांच्या हाताचे
एकमेकांना दिलासे देणारे
पण तसे ते असतात कायमच
स्वप्नात रमणारे नि स्वप्नातच विरणारे.
आता सुरू राहील एक स्वप्न फक्त
जे प्रचंड प्रयत्नानंतरही
संपवता आलं नव्हतं मला
आणि तुलाही
वा संपवता येणार नाही
मला वा तुलाही.

**सचिन हिंदुराव चौगले**
बी. एस्सी. ॥

# इतर

## विद्यार्थ्यांचे वार्षिक नियोजन

एका वर्षामध्ये फक्त ३६५ दिवस असल्यामुळे शक्यतो मुले परिक्षेत नापास होतात. आता बघूया एखाद्या मुलाचे शैक्षणिक वर्ष कसे जाते. तुम्हाला माहीत आहे तरीही लक्षात ठेवा की, एका वर्षामध्ये ३६५ दिवस असतात. एका वर्षामध्ये ५२ रविवार असतात. आता रविवारी अभ्यास करणार की खेळणार ? मग ३६५ मधून ५२ वजा केले की राहिलेत ३१३ दिवस. उन्हाळ्याची सुट्टी, दिवाळीची सुट्टीं, नाताळची सुट्टी अशा ५० सुट्ट्या वजा केल्यास राहिलेत २६३ दिवस. दररोज आपण ८ तास झोपतो. म्हणजे वर्षाला १३० दिवस झोपतो. आता हे दिवस वजा केल्यास राहिलेत १४१ दिवस. मुले रोज १ तास खेळतात. खेळल्याने मुलांची तब्येत सुधारते. अशा प्रकारे रोज १ तास म्हणजे वर्षाला १५ दिवस खेळतात. आता हे दिवस वजा केल्यास राहिलेत १२६ दिवस. दररोज २ तास दुपारचे जेवण, रात्रीचे जेवण आणि न्याहारी करण्यात जातात. म्हणजेच वर्षाला एकूण ३० दिवस लागतात. आता हे दिवस वजा केल्यास राहिलेत ९६ दिवस. दररोज १ तास बोलण्यात आणि इथे तिथे जाण्यात जातो. म्हणजे वर्षाला १५ दिवस लागतात. हे दिवस वजा केल्यास राहिलेत ८१ दिवस. वर्षातील ३५ दिवस शाळेमध्ये परीक्षा असतात. आता परिक्षेच्या दिवशी अभ्यास करणार का पेपर सोडविणार ? हे दिवस वजा केल्यास राहिले ४६ दिवस. वर्षातील ४० दिवस निरनिराळे सण, गणेशोत्सव, नवरात्रौत्सव, इतर लहान-मोठे सण यांच्यामध्ये जातात. आता हे ४० दिवस वजा केल्यास राहिलेत ६ दिवस. वर्षातील ३ दिवस तरी निदान आजारपण, ताप, सर्दी यांच्यामध्ये जातात. आता राहिलेत ३ दिवस. वर्षातील २ दिवस (फक्त) चित्रपट, टी. व्ही. वरील कार्यक्रम बघण्यात जातात. आता उरला १ दिवस आणि त्या दिवशी त्या मुलाचा वाढदिवस असतो आणि या दिवशी तरी कोणी अभ्यास करतो का ? मग उरले ० दिवस. आता सांगा, मुले अभ्यास करणार कधी आणि परिक्षेमध्ये पास होणार कधी ?

**अमोल देसाई** - बी. एस्सी. ।

## शायरी

गणेशोत्सवाच्या देवळात मागणे मागतो
एकच सुखी ठेव देवा तिला जिच्यावर
मी मनापासून प्रेम करतो.
शब्द झाले मुके तरी डोळ्यांनी
तू बोलून जा जाता जाता
एखादी तरी आठवण तू माझ्या मनात ठेवून जा
पापण्यात लपलेली तुझी नजर माझ्याकडे पाहून
लाजत आहे. तुझ्या पायातील पैंजण सुद्धा
माझ्याच नावाने वाजत आहे.
तुझे ते नयन पाहिल्यावर काहीतरी त्यात सापडतं
तू कितीही रागावलीस तरी
त्याकडेच पाहणं मला आवडतं.
काय करू शकतो तुझ्यासाठी
हे आत्ताच सांगणार नाही.
पण जर वेळ आली करण्याची
तर मागे कधीच हटणार नाही.
तू दूर असलीस की,
आठवणीचे झरे उचंबळून वाहतात
तू समोर आलीस की शब्द ओठावरच राहतात.
जीवनामध्ये स्वप्न साजिरे फुलणार कधी कळेना
तुझी न माझी प्रित सखे गं जुळणार कधी कळेना
तूच आहेस सर्वस्व माझं सांग तुला किती जपू
जाणुनी भावना माझ्या दे जीवनभर साथ मला.
मी तुला कधी विसरणार नाही तू ही कधी मला विसरू नकोस. तुझी तू आणि माझा मी असे गणित कधीच मांडू नकोस.
या जगण्या-मरण्यामध्ये एक वेगळाच आनंद आहे
तुझ्या आठवणीच्या सागरात बुडण्यात
खरा परमानंद आहे.
तुझ्या येण्याची माझ्या मनाला केव्हापासून लागलीया
आस, पुष्कळदा तुझे पैंजण वाजतात
पण तो असतो निव्वळ भास.
तुझी आठवण हा तर नित्य नवा अनुभव आहे
कधी उधळणार वादळ
तर कधी पाकळीवरचं दव आहे.
आठवणी हसवतात आठवणी रडवतात
गर्दीत असताना एकटं करतात अन् एकटं असताना डोक्यात विचाराती गर्दी करतात. म्हणूनच आठवणी हसवतात आणि आठवणी रडवतात.

**दिगंबर केरबा पाटील**
बी. ए. ॥

## चारोळ्या

तो बुडताना मी त्याच्याकडे धावलो
ते मदतीला नव्हे सोबतीला
कारण मला तरी
कोठे येथे पोहायला ?

सगळीच वादळे मी
खिडकीतून बघून पाहिली
पण परवाच्या वादळात
माझी खिडकीच वाहून गेली.

तळ्याकाठचं गवत तळ्याशी
सलगीनं वागायचं
कारण त्याला जगायला
तळ्याचं पाणी लागायचं.

मी बुडताना माझे गाव
ओझरतं पाहिले होते
मला पाहायला माझे गाव
काटावर उभे राहिले होते.

**निलेश विलास माने**
बी. ए. ॥




अक्षय आनंदा पाटील
बी. एस्सी. ।




पूनम महादेव पाटील
बी. एस्सी. ।



ऋतुजा सिताराम पाटील
बी. एस्सी. II



ऋतुजा सिताराम पाटील
बी. एस्सी. II



ऋतुजा सिताराम पाटील
बी. एस्सी. II



**ऋतुजा सिताराम पाटील**
बी. एस्सी. II



**ऋतुजा सिताराम पाटील**
बी. एस्सी. II

# स्पंदन प्रकाशक व मालकीसंबंधी माहिती


| | | |
|---|---|---|
| प्रकाशन स्थळ | - | दूधसाखर महाविद्यालय, बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर. पिन कोड - ४१६ २०८ फोन : (०२३२५) २५४८२२ |
| प्रकाशन काळ | - | वार्षिक |
| प्रकाशक व प्रमुख संपादक | - | प्राचार्य डॉ. आर. एल. राजगोळकर |
| राष्ट्रीयत्व | - | भारतीय |
| पत्ता | - | दूधसाखर महाविद्यालय, बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर - ४१६ २०८ |
| कार्यकारी संपादक | - | प्रा. डॉ. संजय दशरथ पाटील भ्रमणध्वनी - ८००७४१०७८४ |
| राष्ट्रीयत्व | - | भारतीय |
| पत्ता | - | दूधसाखर महाविद्यालय, बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर - ४१६ २०८ |
| मुखपृष्ठ | - | मणिपद्म |
| संकल्पना | - | प्रा. डॉ. संजय दशरथ पाटील |
| मुद्रक | - | श्री. आर. डी. पाटील (देवाळेकर) श्रीपाद ऑफसेट, ४६४ ई, शाहूपुरी, कोल्हापूर. |
| राष्ट्रीयत्व | - | भारतीय |
| पत्ता | - | व्हिनस कॉर्नर, शाहूपुरी, कोल्हापूर. फोन : (०२३१) २६५८४०१ |

मी, प्राचार्य डॉ. आर. एल. राजगोळकर असे जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरी आहे.


या अंकातील मजकुराशी संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.

करें प्रयत्न सदा उन्नति का,
मिले उसी पर तोष करें ।
काल-कर्म पर तथा भाग्य पर,
व्यर्थ न हम फिर दोष धरें ।

## हिंदी विभाग

प्रा. डॉ. एस्. बी. देसाई

# अनुक्रमणिका

## गद्य विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| १) | २१ वी सदी का भारत | : अमोल पांडुरंग पाटील B.Sc. - I | ४७ |
| २) | दोस्ती | : कु. शितल रावसाहेब फराकटे B. A. - III | ४९ |


## पद्य विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| १) | क्या कमाना चाहते है | : कु. सुप्रिया बाजीराव पाटील B. A. - III | ५० |
| २) | प्यार का कम्पूटर | : अक्षय आनंद पाटील B. Sc. - I | ५० |
| ३) | बिदाई | : कु. आरती अशोक घारे B. A. - II | ५१ |
| ४) | झूठ और सच | : कु. राजश्री कृष्णात फराकटे B. A. - III | ५१ |
| ५) | हमारा कॉलेज | : कु. सविता रंगराव पाटील B. A. - III | ५२ |
| ६) | मित्रता | : दिगंबर तानाजी भोईटे B. A. - II | ५२ |
| ७) | एक चेहरा | : कु. मेघा सुभाष पाटील B. A. - II | ५२ |
| ८) | दोस्ती | : कु. प्रियंका प्रकाश जगदाळे B. A. - III | ५३ |
| ९) | जिये जा | : चंदन जयसिंग माटूंगे B. A. - III | ५३ |


## संकलन


| | | | |
